# परमेश्वराचे वचन ऐकणे, ओळखणे, त्यावर कृती करणे

आता, ह्या टेप, ज्या ह्या सकाळी ह्या सभेच्या आहेत, त्या विकल्या जात नाहीत, ह्या फक्त मंडळीसाठी किंवा त्याच्यासाठी आहेत, कारण त्या सिध्दांतावर आहेत. आणि त्या बाहेरील सभेत तेथे, गोंधळ निर्माण करतात, कारण आपल्यातील केवळ काहीजण आहेत जे पूर्णत: वखर समजतात; परंतु आपण अंत:करणातून समजलो पाहीजे, कसेही करुन, परंतु, ह्या टेप, जे आपण ह्या भवनात आहोत, त्यांच्यासाठी आहेत, तुम्ही त्यावर लक्ष द्या…ह्या फक्त मित्रांसाठी आहेत, आणि तशा सारख्या.

2 आता आपण आपली मस्तके काही क्षणासाठी झुकवूया. किती जणांची इच्छा आहे की तुमची आठवण केली जावी जेव्हा तुम्ही तुमची मस्तके झुकविली आहेत? फक्त तुमचे हात उंचवा, म्हणा, "प्रभू, मी—मी आज गरजू आहे, आणि मला तुझ्या कृपेची गरज आहे," ज्या कशाकरिता आहे.

3 आमच्या स्वर्गीय पित्या, आम्ही आता तुझ्या दयेच्या राजासनाकडे येतो, कारण आपणास असे करण्यास सांगितले आहे. आणि हे आम्हाला तुझ्या पुत्रा, आमचा तारणारा, ह्याद्वारे सांगितले आहे, की जर आम्ही तुझ्याकडे त्याच्या नावाने जे काही मागाल, ते दिले जाईल. म्हणून, प्रभू, हे जाणून की आम्ही त्याच्या आगमनाच्या छायेत राहात आहोत, आणि आता त्याच्या दयेच्या छायेत उभे आहोत, आम्ही मागावे, प्रभू, की, तुझ्या पवित्र आत्म्याद्वारे, तू त्या गोष्टींची निवड करावी ज्याकरिता आम्ही मागावे. आणि आम्हाला ह्या सकाळी वाटते, की हे तुझ्या वचनाविरुध्द होणार नाही किंवा तुझे महान नितीमत्त्व, आणि तुझी दया आणि कृपा ह्या विरुध्द होणार नाही, की जर आम्ही मागावे की आज त्या पवित्र आत्म्याकडून आम्हाशी विशेष भेट व्हावी. की त्याने आमच्या मध्ये यावे आणि आमच्या अंत:करणातील विचाराचे परिक्षण करावे, आम्हास आमची अशक्त स्थिती दाखवावी, आणि आमचे आजार बरे करावे, आणि तुटलेली अंत:करणे जोडावी, आणि हरवलेल्यांना वाचवावे, आणि लोकांना त्याच्या आगमनाकरिता तयार करावे. प्रभू ही प्रार्थना ऐक.

4 आता आम्ही तुझे वचन ऐकण्यास जात आहोत. आणि—आणि आम्ही प्रार्थना करतो, प्रभू, ह्या सकाळी आमच्या संडे स्कूल अध्यायावर, की तू, त्या वचनाचा संदर्भ पुढे आण आणि आमच्या हृदयास ते प्रगट कर. कारण, आण येथे एकाच उद्देशासाठी आलो आहे. तो उद्देश, एकच, आहे की तुला अधिक जाणावे. आम्ही, जे विश्वासाद्वारे, ख्रिस्ती आहोत. तुला अधिक जाणू इच्छितो. ते जे अजून ख्रिस्ती झालेले नाहीत, तुला त्यांचा तारणारा म्हणून जाणू इच्छितात. जे आजारी आहेत, ते तुला त्यांचा आरोग्यदाता म्हणून जाणू इच्छितात. आणि आम्ही प्रार्थना करितो की ह्या इमारतीतून एकही जण रिकामा जाणार नाही, परंतु प्रत्येक विनंती पूर्ण केली जाईल, आणि प्रत्येक इच्छा तृप्त केली जाईल, आणि प्रत्येक—प्रत्येक व्यक्ती आनंदी होईल, आणि ह्या इमारतीतून जाताना, म्हणेल, जसे अमाऊसहून येताना ते म्हणाले, "तो वाटेने आपल्याबरोबर बोलत असता आपल्या अंतःकरणाला आतल्या आत उकळी येत नव्हती काय?" आम्ही हे येशूच्या नावाने मागतो. आमेन.

5 आता तुम्ही जे तुमच्या पुस्तकामध्ये पाहू इच्छीता. सामान्यत:, मला आढळून आले की शुभवर्तमानाच्या सभेमध्ये, केवळ वीस किंवा तीस मिनीटाचा आध्यात्मिक संदेश उत्तम परिणाम करतो, आणि मग वेदीजवळ बोलावले जाते. परंतु हे संडेस्कूल असल्यामुळे, मला ते त्या प्रकारे ह्या सकाळी करायचे नाही. मला अधिक माझा वेळ घेण्याची इच्छा आणि देवाच्या वचनावर बोलण्याची प्रेरणा होते.

6 आता, जर कोणी अस्वस्थ, खूप थंड असेल, तर एकच गोष्ट तुम्ही करावी…माझा भाऊ, संरक्षक, प्रार्थनागृहाच्या मागे *तेथे* आहे, फक्त तुमचा हात वर करा, त्याच्याकडे, आणि तो ती गर्मी नियमीत करील. आणि आमची इच्छा आहे की तुम्ही आरामदायक असावे आणि चांगला अनुभव करावा. आणि वचन लक्षपूर्वक ऐकावे, कारण आपण पवित्र आत्म्यावर विश्वास करतो की त्याने आम्हास देवाचे वचन शिकवावे. आणि काय मागे तुम्हा सर्वांना व्यवस्थित ऐकू येत आहे. जर तुम्ही ऐकू शकता, तर तुमचे हात वर करा, जर तुम्ही—तुम्ही व्यवस्थित ऐकू शकता. हे चांगले आहे.

7 आता माझी इच्छा आहे की तुम्ही माझ्याबरोबर, वळावे, माझ्याकडे काही संदर्भ येथे लिहीलेले आहेत, आणि काही वचने. म्हणून माझी इच्छा आहे की तुम्ही माझ्याबरोबर, प्रथम, रोमकरांस पत्र, रोमकरांस पत्र 9वा अध्याय. आणि आम्ही वचनाकरिता अध्याय वाचू इच्छितो, प्रथम, रोमकरांस पत्र 9:11

*(मुले अजून जन्मली नव्हती व त्यांनी काही बरे वाईट केले नव्हते. तेव्हा निवडीसंबंधाने देवाचा जो संकल्प असतो, म्हणजे जो कर्मामुळे नव्हे तर, पाचारण करणाऱ्याच्या इच्छेने असतो तो कायम राहावा.)*

*म्हणून तिला सांगण्यात आले, वडील धाकट्याची सेवा करील.*

*त्याचप्रमाणे शास्त्रात असे लिहीले आहे की, मी याकोबावर प्रीती केली आणि एसावाचा द्वेष केला.*

8 परमेश्वर ह्या वाचल्या गेलेल्या वचनावर त्याचा आशीर्वाद पाठवो. आणि आता ह्या वचनाकरिता, माझ्या धड्याला पुष्टी देण्यासाठी, मी ह्यास हे शीर्षक देऊ इच्छितो. *देवाचे वचन ऐकणे, ओळखणे, त्यावर कृती करणे.* ते मी पुन्हा सांगू शकतो का, "देवाचे वचन ऐकणे, ओळखणे, त्यावर कृती करणे."

9 आता, आपण हे पूर्णत: जाणतो, आपण जे वचनांचा दिवस व रात्र शोध करितो, आणि आपले वृत्तपत्र वाचतो आणि वृत्त समालोचकांना ऐकतो, की हे जग आता दोन महान आध्यात्मिक शक्तींच्या मुठीत आहे. आणि त्या दोन्ही धार्मिक शक्ती आहेत. आणि मी विश्वास करतो की ह्या महान शक्ती लवकरच पुढे येणार आहेत. आणि ह्या दोन्हीही महान शक्ती याकोबाच्या दोन पुत्रामध्ये प्रकट केल्या होत्या. कसा तो परमेश्वर त्याच्या अमर्याद ज्ञानाने, आम्हास ह्या गोष्टी पूर्वदर्शनाने दाखवितो ह्यासाठी आपण ह्या गोष्टी, निश्चितपणे जाणाव्या, ज्या आपल्यापुढे ठेवलेल्या आहेत. त्या इतक्या स्पष्ट केल्या आहेत, की परमेश्वर आणि त्याचे वचन, सृष्टी आणि त्याचे विश्व, हे अशाप्रकारे पूर्णपणे एकत्रितरित्या आयोजीत केलेले आहे, की जसे एक पापी देखील समजू शकतो की काहीतरी घडण्याचे ठरले आहे. देवाने ते अशाप्रकारे योजलेले आहे. कोणालाही सबब मिळणार नाही.

10 आता, आपण ह्या दोन पुत्रांमध्ये पाहतो की जेव्हा ते त्यांचा जन्म होण्याआधी, ते एकमेकांशी युध्द करीत होते. जरी त्यांची आई…कारण, ती एक कुमारी होती, ती सुंदर रिबेका जिचा विवाह परमेश्वराच्या अभिवचनाच्या नीतीमान बीजाशी इसहाकाशी झाला होता, ती दोघेही समर्पित आत्म्याने भरलेले देवाचे विश्वासी होते, त्या लग्नासाठी पूर्वनियुक्त केलेले की ते एकत्र संघटीत केले जावे. देवाला त्याचे पूर्वज्ञान होते. आणि कशी

अशी गोष्ट एकाच माता–पित्याकडून येऊ शकते एक खूप दुष्ट व्यक्ती, आणि दुसरा, खूप चांगला व्यक्ती आणि कसा एक चांगला व्यक्ती दुष्ट वाटतो, आणि दुष्ट व्यक्ती चांगला वाटतो.

11 आता तो, नेहमीच, नेहमीच हि देवाची योजना असणार. देव त्याची योजना बदलू शकत नाही. कारण, तो त्याची योजना परिपूर्ण बनवतो, कारण ती त्याचा भाग आहे.

12 एदेन बागेत, पाप इतके सुंदर होते की त्याने हव्वेला नीतीमत्त्वांतून, पापाकडे आकर्षित केले. आणि त्याच बागेत जेथे एक जीवनाचे झाड होते, तेथे मृत्यूचेही झाड होते.

13 आपण आज विरुध्दतेचा नियम पाहूया. ते, जेथे चांगले आहे, तेथे वाईटही आहे. जेथे खरे आहे, तेथे खोटेही आहे. आणि आपण, कुठल्याही वातावरणात का असेना, त्या गोष्टींच्या अस्तित्वाने हादरुन जातो. कारण, पौलाने म्हटले, "जेव्हा मी चांगले करतो, तेव्हा वाईट उपस्थित असतेच." एक पापी कधीही ख्रिस्ती व्यक्तींपासून दूर होऊ शकत नाही, एक ख्रिस्ती पाप्यापासून. तेथे नेहमीच खऱ्याची साक्ष असेल, आणि खोट्याची ही साक्ष असेल. आणि तुम्ही तुमची निवड करता. तुम्हाला एक बाजू घ्यावी लागते किंवा दुसरी.

14 परंतु ह्या दोन पुत्रांमध्ये, हे जाणणे थोडेसे वेगळे वाटेल त्यांचा जन्म होण्याआधी, दोघेही एकाच बीजांतून, इसहाकापासून, जे अभिवचनाचे होते. आता, आपल्या शिक्षणाचा पाठ जरा विस्तृत आहे, आणि माझी इच्छा आहे की पुरेशी पार्श्वभूमी द्यावी ह्यासाठी तुम्हाला व्यवस्थित कळावे की मी कशाविषयी बोलत आहे. आणि प्रथम पुत्र, एसाव, जन्मला होता आपण पाहतो की ते केवळ त्यांच्या आईच्या गर्भातच बडबड करीत आणि भांडत नव्हते, परंतु ते तिच्यातून झगडतच आले, एसाव अगोदर आला, याकोब त्याची टाच हातात घेऊन होता. आणि ते आजही झगडत आहे.

15 आणि ते कसे, कसे त्या परिपूर्ण, पवित्र, निवडलेले, शुध्द, समर्पित पिता किंवा मातेपासून येऊ शकते! म्हणून त्याचे समर्थन करण्यासाठी, देव त्यास निवड असे संबोधतो. ते तसेच असले पाहिजे तुमचे आई आणि वडिल किती चांगले आहेत, किती भले ते होते, किती चांगले ख्रिस्ती तुमचे वडिल व आई असे ना, त्याच्याशी काही कर्तव्य नाही, ते तुमच्याकडे एक व्यक्ती म्हणून गणले जाते, देवासमोर तुमची योग्यता. हा धडा शिकवतो की, की ते, दोन्ही पूत्र, जरी तेथे ते एका निवडलेल्या आणि देवाने बोलाविलेल्या, पिता आणि माता, एक कुमारी स्त्री आणि एक पवित्र पुरुष, जे बीज शेवटी येशू ख्रिस्ताद्वारे आले होते. त्याचा जन्म मृतापासून झाला होता. त्याला पारखले होते, त्याच्या आधी त्याचा पिताही. आणि त्याला अभिवचन देण्यात आले होते, इसहाकाच्या वंशाद्वारे, संपूर्ण जग तारले जाईल. आणि त्या सारख्या मनुष्यातून, आणि त्याचे रक्त इतके पवित्र की देवाने पलीष्ट्याला त्याच्या आईला स्पर्श करु दिला नाही, जेव्हा अब्राहामाने तिला त्याला दिले होते. देवाने त्याच्या घराण्यावर पीडा आणली, आणि म्हटले, "तुझा अंत झालाच," शुध्द रक्तवाहिनी तिच्यात होती. आणि रिबका, एक नीतीमान, पवित्र, देवाने पाठविलेली आणि देवाने नियुक्त केलेली आई. आणि त्या पवित्र बीजाकडून एक विश्वासघातकी आणि एक विश्वासी. समजले? म्हणून हे देवाचे बोलावणे, देवाची निवड ह्या अधीन आहे.

16 "आणि एकाचाही जन्म झाला नव्हता, देवाने म्हटले, 'मी याकोबावर प्रीती केली, आणि एसावाचा द्वेष केला,' एकाचाही जन्म होण्याआधी." म्हणून आम्हाला किती बरे वाटले पाहिजे. तुमच्याशी देव बोलला आहे आणि तुम्हाला त्याच्या मेजाजवळ येण्याचे आणि त्याच्या घरी येण्याचे आमंत्रण दिले, आणि त्याचे पुत्र किंवा कन्या व्हावे, तेथे ह्यापेक्षा महान गोष्ट नाही.

17 ही दोन लेकरे, जर आपण त्यांच्या स्वभावाचे निरिक्षण केले, त्यांच्यातील एक आध्यात्मिक मनुष्य होता, तो याकोब होता. आणि एसाव दैहीक मनुष्य होता. परंतु दोघेही धार्मिक होते. आणि तीच गोष्ट युगांपासून, घडत आली आहे, दैहीक आणि आध्यात्मिक.

18 एसाव भूमीवरील मनुष्य, नैसर्गिक, धार्मिक मनप्रवृत्ती दर्शवितो, परंतु समर्थ नसलेला. त्याच्यामध्ये ते नव्हते की ते करावे. तो ते करु शकला नाही. त्याच्यामध्ये ते नव्हते की तो जगातील गोष्टी, त्या दैहीक गोष्टी पार करुन जाईल.

19 परंतु, याकोब, त्याच्यासाठी ते करणे फारच सोपे होते. आता, याकोब, याकोबाचा एकच उद्देश होता, आणि तो म्हणजे ज्येष्ठत्वाचा हक्क मिळविण्याची इच्छा, मग हे महत्त्वाचे नाही की तो कसा मिळवावा, म्हणून त्याप्रकारे त्याने तो मिळवला.

20 त्या एक जन्माचा आत्मा आजही जगात दर्शविला जात आहे, आणि आता तो मस्तकाला पोहचला आहे: आत्मिक विश्वासी आणि दैहिक मनुष्य, दैहिक विश्वासी. कोणीही सांगू शकणार नाही की ते दोघेही धार्मिक नव्हते. ते होते. त्यांनी असे सांगितले नाही की एक “मूर्तीला” भजत होता आणि दुसरा, “देवाला.” ते दोघेही देवाचे सेवक होते.

21 आता, ह्या विषयावरील वचनाकडे बारकाईने लक्ष द्या, कारण माझी खात्री आहे ते तुम्हास सहाय्य करील. समजले? आता, “मला ‘प्रभूजी, प्रभूजी,’ असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल असे नाही, तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल.”

22 आता जर तुम्ही लक्ष दिले, याकोबाकडे एक गोष्ट होती जी त्याला हवी होती, कारण, जगाप्रमाणे, आशीर्वाद आणि त्या—त्या चांगल्या गोष्टी ज्येष्ठपणाच्या हक्कामध्ये ठेवलेल्या असतात. आणि, याकोब, तो त्याचा एकच उद्देश होता. एकच गोष्ट त्याच्या मनात होती, “तो ज्येष्ठत्वाचा हक्क मिळविणे.” आणि एसावाने तो तुच्छ लेखला. ज्याचा वास्तविक तो होता, त्याने त्यास तुच्छ लेखिले, किंवा त्याची त्याला लाज वाटली. परंतु याकोबाला तो कसेही करुन हवा होता, त्याला तो हवा होता.

23 तशीच स्थिती आज आत्मिक विश्वासीची आहे. तो त्याची तमा बाळगत नाही की तुम्ही किती त्याच्यावर हसता, तुम्ही किती त्याची मस्करी करता, किती उपहासात्मक रितीने त्याला दैहीक मनाच्या व्यक्तीशी वागावे लागते. त्याचा एकच उद्देश तो म्हणजे ज्येष्ठत्वाचा हक्क आहे. त्याला देवाकडे जायचे आहे. कारण त्याचा जन्म त्यामध्ये झाला आहे. तो काहीच करु शकत नाही.

24 *याकोब*, म्हणजे “दुसऱ्याची जागा घेणारा” किंवा “फसवा.” परंतु ज्येष्ठत्वाचा हक्क मिळविल्यावर आणि त्याचा अधिकार प्राप्त झाल्यावर, तो बदलला. तो दैहिक होता, बदलला. तेव्हा त्याला याकोब म्हटले गेले. “देवाबरोबर राजकुमार,” जो त्याच्याबरोबर झगडला होता.

25 दैहिक विश्वासी आज म्हणतो, “ओह, जोपर्यंत मी मंडळीत जातो आणि जे योग्य ते करतो, त्याने काय फरक पडतो?” तो एसावाचा समुह आहे. तो अजूनही थट्टा करतो आणि ज्येष्ठत्वाचा हक्क तुच्छ लेखतो, त्याला त्याची पर्वा नाही. परंतु याकोबाचे त्यावर प्रेम होते.

26 आणि आज आत्मिक पुरुष, आणि आत्मिक स्त्री, जी निवडलेली आहे, देवाने सार्वकालिक जीवनासाठी पूर्वनियुक्त केलेली आहे, जर त्यांना आपल्याजवळील सर्वकाही विकावे लागले, जर त्यांना त्यांची नावे राष्ट्रातील प्रत्येक चर्चमधून काढावी लागली, तरी त्यांना तो ज्येष्ठत्वाचा हक्क हवा आहे. ही एकच गोष्ट आहे. ज्याची ते काळजी करतात. “ज्येष्ठत्वाचा हक्क मिळविणे.” तेच सर्व आहे. ह्या गोष्टीची ते पर्वा करीत नाही की कसे,

कोणत्या पातळीला त्यांना यावे लागेल, जर त्यांना वेदीजवळ खाली पडून रडावे लागले, तर त्यांना ठीकाणाकडे धावावे लागेल आणि परत जाऊन गोष्टी नीट कराव्या लागतील, आणि त्यांच्याजवळ असेल ते विकावे लागेल, किंवा—किंवा त्यांच्याजवळील सर्वकाही द्यावे लागेल आणि एक यात्री आणि परके बनावे लागेल, तरी हरकत नाही. त्यांना तो ज्येष्ठत्वाचा हक्क हवा आहे. त्यांचा संपूर्ण रस त्यात आहे, ज्येष्ठत्वाचा हक्क. आता, त्या लोकांना दोष देऊ नका. ते काही करु शकत नाही. ते त्यासाठी पूर्वनियोजीत केलेले आहेत, त्यासाठी निवडलेले आहे.

27 आणि मग आपण त्या दोघांना पाहतो, दैहिक आणि आत्मिक लोक, तशाचप्रकारे नेहमी घडत आले आहे. तसेच आजही आहे. ते नेहमी तसेच आहे.

28 काईन आणि हाबेल. एदेन बागेत, जेव्हा एदेन बाग निर्माण केली होती, तेथे दोन झाडे मनुष्यासाठी होती ज्याची त्याने निवड करावी. एक, जे ज्ञानाचे होते; दुसरे, जीवनाचे होते. तेथे दोन मुले होती, काईन आणि हाबेल, दोघंही धार्मिक होते. त्यांच्यातील एकाने सार्वकालिक जीवनाची इच्छा धरली, आणि त्याने परमेश्वराला, विश्वासाद्वारे, काईनापेक्षा एक चांगला यज्ञ समर्पित केला. आजच्या मंडळीचे एक परिपूर्ण उदाहरण. दैहिक मंडळी, आत्मिक मंडळी, आणि ह्यात संशय नाही परंतु मी आज ह्यावेळी दोन्ही प्रकारच्या लोकांशी बोलत आहे, किंबहुना ह्या टेपद्वारे त्यांच्यातील सहस्त्रांशी बोलत आहे.

29 परंतु, पाहा, स्वाभाविक मंडळी, ही केवळ दैहिक मंडळी आहे. ते कधीही ह्या लहान गोष्टीच्या वर जाऊ शकत नाही, "मी मंडळीत सहभागी झालो आहे. जर मी मंडळीत जातो, जर मी जे उत्तम ते करतो, हेच सर्व देवाला हवे आहे." आता, तीच गोष्ट काईनाने केली. तो गेला आणि त्याने एक वेदी उभारली. त्याने अर्पण दिले, त्याच्या भूमीतील फळे आणली आणि त्याने म्हटले, "येथे हे आहे, देवा. हे सर्वोत्कृष्ट माझ्याकडे आहे. ह्याचा स्विकार कर किंवा सोडून दे." तशाच तऱ्हेने आज दैहिक विश्वासी विश्वास करीत आहे. "प्रभू, मी मंडळीत जाईन. मी उत्कृष्ट समुह जो मला सापडेल तेथे जाईन. मी माझे देणे मंडळीत देईन. मी जे योग्य ते करीन. आता, हे सर्वोत्कृष्ट आहे जे मी करु शकतो. मी खिडकीसाठी काही विकत घेण्यास मदत करेन किंवा, मी मुलांना काही कपडे देईन." त्यांच्यासाठी हे सगळे बरोबर आहे. त्याच्याविरुध्द काहीच बोलू नये. "परंतु तेच सर्व आहे, तेच सर्व आहे. जर तुम्हाला पाहिजे असेल, तर घ्या, जर तुम्हाला नको असेल, तुम्हाला ते घेण्याची गरज नाही." आता, दैहिक मंडळीचा हा स्वभाव आहे.

30 परंतु आत्मिक मंडळी! हाबेल प्रकटीकरणाद्वारे, कृपेद्वारे, तो पलिकडचे पाहू शकतो, आणि विश्वासाने त्याने काईनापेक्षा अधिक चांगला यज्ञ देवाला दिला. आणि देवाने, त्याच्या नीतिमत्वाची साक्ष दिली.

31 तीच गोष्ट इश्माएल आणि इसहाकाच्या बाबतीतही घडली, एक दैहिक होता, आणि दुसरा आत्मिक होता, एक दासीपुत्र, एक स्वतंत्र स्त्रीपासून.

32 तीच गोष्ट इस्त्राएल आणि मवाबमध्ये सुध्दा घडली, दोन मोठ्या मंडळ्या एकत्रित येताना. आणि जेव्हा इस्त्राएल त्यांच्या वचनदत्त देशात जाऊ इच्छित होता, आत्मिक मंडळी, याकोबाचे लोक, इस्त्राएल प्रवासात होता; एसावाचे लोक त्यांना भेटले, मवाब, सामर्थ्यशाली मंडळी. आणि त्या मंडळीचा महान नेता, बलाम, त्याच्या भावाला शाप देण्याकरिता खाली आला, परंतु त्याला समजले की तो त्याच्या भावाला शाप देऊ शकत नाही. तो त्याच्या डोळ्यांच्या अंधत्वामुळे, पूर्वनियोजीत योजना व परमेश्वराचे वचन पाहण्यास अपयशी ठरला.

33 प्रथम, "विश्वास देवाचे वचन ऐकल्याने येतो." तेव्हा विश्वासी ते ऐकतो, ते ओळखतो, आणि त्यावर कृती करतो. दैहिक मनुष्य ते ऐकतो, त्याचा आवाज, परंतु कधीच... *ऐकणे* म्हणजे ते "समजणे." पाहणे (लूक अॅट) म्हणजे एखाद्या गोष्टीकडे पाहणे, *पहाणे* (टू सी), म्हणजे "ते समजणे." "नव्याने जन्मल्या खेरीज मनुष्याला, देवाचे राज्य पहाता किंवा समजता येत नाही."

34 आता येथे इस्त्राएल, ते वचनदत्त देशाकडे निघाले होते. नास्तिक नव्हे, परंतु विश्वासी, त्याच देवावर विश्वास ठेवणारे ज्यावर इस्त्राएल विश्वास करीत होते, त्याच्या भावाला शाप देण्याचा प्रयत्न करीत होते, कारण त्याने म्हटले त्याचा भाऊ, निश्चितच अनीतिमान होता कारण त्याने अशा खूप गोष्टी केल्या होत्या ज्या वाईट होत्या. परंतु, तो ती निवड समजण्यास अपयशी ठरला.

35 एसाव आणि याकोबासह तीच गोष्ट! एसाव एक चांगला मनुष्य वाटत होता. तो स्थिरस्थावर होता आणि दानधर्म करणारा होता. तो—तो त्याच्या वयस्कर अंध वडिलांची काळजी घेत होता, आणि एक चांगला मुलगा होता. धर्माच्या ओघात दैहिक विश्वासी पुष्कळ गोष्टी करतात. समाजाला मदत, आणि—आणि लोकांसाठी हॉस्पिटलची बिले भरतात आणि धार्मिक गोष्टी, परंतु मी त्याविषयी बोलत नाही.

36 मवाब हे एक चांगले, मोठे राष्ट्र होते, त्याचा एक भाऊ होता. आणि याकोबाने त्या सर्व गोष्टी केल्या होत्या, तो एक विश्वासघातकी होता, परंतु तरीही त्याला एक गोष्ट मिळवायची होती, ती म्हणजे ते अभिवचन प्राप्त करुन घेणे, तो ज्येष्ठत्वाचा हक्क. येथे इस्त्राएल होते, याकोबाचे पुत्र, त्याच उद्देशासह. आता कोण बरोबर आहे?

37 बलामाने सात वेद्या बांधल्या; इस्त्राएलात तेथे सात वेद्या होत्या. बलामाने शुध्द पशूंचे सात यज्ञ केले; इस्त्राएलाने शुध्द पशूंचे सात यज्ञ केले. तेथे, जर धार्मिक पध्दतीने पहाता, मवाब हा इस्त्राएलाइतकाच धार्मिक होता, एसाव याकोबाइतकाच धार्मिक होता, आणि काईन हा हाबेलाइतकाच धार्मिक होता. परंतु, ती निवड आहे जी ते ठरवते.

38 किती आंधळे! एसावाची संतती किती आंधळी होती, आत्मिक रीतीने बोलताना, मवाबाने, खाली इस्त्राएलावर पाहीले आणि म्हणाले, "त्यांच्याकडे पाहा. ते संप्रदाय नाहीत. ते विश्वासघातक्यांचा एक समुह आहेत. ते तंबूत राहतात. आणि आम्ही एक महान राष्ट्र आहोत. त्यांनी दुष्कर्म केले. आणि त्यांच्यामध्ये संघटना नाही. ते केवळ संदेष्ट्यांच्या मागे फिरत होते." परंतु तो पितळी सर्पाला आणि त्यांच्यासमोर असलेल्या प्रहार केलेल्या खडकाला पहाण्यात असफल ठरला, तो निवडलेल्या लोकांना समजण्यास असफल ठरला, देवाच्या दैवी आज्ञेप्रमाणे वचनदत्त भूमीकडे चालणाऱ्या निवडलेल्या समुहाला पहाण्यास तो असमर्थ ठरला.

39 आजही तसेच आहे. ते म्हणतात, "तो एक देवविषयक वेड्या लोकांचा समुह आहे. हा एक असा समुह आहे जो *हा*, *तो* किंवा *दुसरा* आहे." परंतु ते हे पहाण्यास असमर्थ ठरतात की ते देवाच्या वचनाच्या दिशेने चालतात.

40 इस्त्राएल वचनदत्त देशाच्या मार्गात होता. देवाने, त्याच्या वचनात, एक अभिवचन दिले होते.

41 याकोब ह्याने ज्येष्ठत्वाचा अधिकार मिळविण्याची निवड केली, कसेही करुन, त्याला ते मिळविण्याची इच्छा होती, कारण त्याला माहीत होते की ज्येष्ठत्वाच्या अधिकारातच आशीर्वाद आहे. त्यातच जीवन आहे. तो त्याविषयी काळजी करीत नाही की तो कसा मिळेल, म्हणून त्याला तो मिळाला. ती महत्त्वाची गोष्ट आहे. तो कसा येईल हे त्याच्यासाठी महत्त्वाचे नाही. त्याला तो हवाय. आणि त्याला तो मिळालाच पाहीजे. आणि त्याला

तो मिळाला. "ते धन्य आहेत जे नीतिमत्वासाठी भूकेलेले व तहानलेले आहे, ते तृप्त केले जातील." तो त्याच्या मार्गावर होता, आणि तो त्याच्या मागे होता, आणि त्याला तो मिळाला.

42 इस्त्राएल त्याच्या वचनदत्त भूमीच्या मार्गावर होते. ह्याच्याशी कर्तव्य नाही की किती मवाबी आणि त्यांनी किती शाप त्यांना देण्याचा प्रयत्न केला, ते थेट वचनदत्त देशात गेले.

43 आणि आज तुम्ही कधीच…त्यांना कितीही कायदे मिळेनात, किती खटला, किती छळ, कितीही वाईट गोष्टी त्यांनी केल्या, किती वेळा त्यांनी "देवविषयक वेडे" असे म्हटले, कितीतरी वेळा त्यांनी त्या वाईट गोष्टी बोलल्या, मंडळी पुढे चालत राहील. ती चाललीच पाहीजे. ती देवाच्या वचनात राहात आहे.

44 एकदा दोन राजे एकत्र आले. त्यांतील एक अहाब होता, एक दुष्ट, दुसरा यहोशाफाट होता; आत्मिक मंडळी, दैहीक मंडळी.

45 अहाब एक काठावरचा विश्वासी होता. त्याच्याकडे संदेष्टे होते. ते नास्तिक नव्हते. ते मुर्तीपूजक नव्हते. ते इस्त्राएली संदेष्टे होते, परंतु ते सर्व अहाब राजाकडून शिकवलेले आणि भरवलेले आणि पांघरलेले होते. ते असे ठिकाण होते जेथे त्यांना पूर्ण राजकीय पाठिंबा होता.

46 यहोशाफाट आत आला, नमला, अहाबाशी युती केली, जे चुकीचे होते.

47 तुम्ही अविश्वासणाऱ्याबरोबर कधीही जोडले जाऊ नये. आपण कधीही, कुठल्याही प्रकारे नाही, आपली नावे अशा आराधनालयाच्या पुस्तकात टाकू नये. जे पूर्ण सुवार्तेवर विश्वास ठेवीत नाही. कदापि नाही! तुम्ही संकटात पडाल.

48 आणि ते संकटात पडले आणि हा नीतीमान मनुष्य म्हणाला, "आपण प्रथम देवाकडून मसलत घेऊ नये का, आणि पाहावे की आपण रामोथ गिलादावर चढाई करु शकतो का?"

49 आता पाहा किती परिपूर्ण प्रसंग आहे. "रामोथ गिलाद आमचे आहे. ते आमच्या मालकीचे आहे, आणि अराम्यांनी ते जीवंत देवाकडून घेतले आहे. आपण वर जाऊ आणि हा देश हस्तगत करु नये काय?" आणि त्याने असे भाष्य केले जे इतके सुंदर आणि इतके कायदेशीर, आणि इतके नीतीचे होते, की जो पर्यंत यहोशाफाट त्यावर भूलला.

50 आणि, आज, मनुष्य मंचावर बौध्दीक आणि वक्तृत्व करीत, आणि शिक्षणाने उभे राहू शकतात, ते बायबल बाहेरील पवित्र आत्म्याचे सामर्थ्य समजावित आहे. ते दैवी आरोग्य समजावित आहेत. ते अनन्य भाषा बोलत आणि त्याचे भाषांतर करीत आहेत, ते दुसऱ्या दिवसातील, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा शिकवीत आहेत.

51 परंतु एक मनुष्य जो देवाचा निवडलेला आहे, एक मनुष्य…"माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात." तुमच्याकडे देवाची तुम्हावर केलेली निवड आहे, जी तुम्हाला कधीच अडखळू देणार नाही.

52 यहोशाफाट म्हणाला, नीतिमान राजा म्हणाला, "येथे कोणीतरी परमेश्वराचा संदेष्टा आहे ज्याचा आपणाला सल्ला घेता येईल?" अहाब त्याशिवाय पुढे चालला होता.

53 अशाचप्रकारे आजची दैहीक मंडळी करत आहे. ओह, त्यांच्याकडे सेमिनऱ्या आहेत ज्या प्रचारकांनी, महान लोकांनी, महान प्राचार्य, हुशार, चलाख, थट्टेखोर, ओह, माझ्या देवा, आत्मिक मंडळ्यांपेक्षा कितीतरी पुढे दैहिक मंडळ्या…आहेत.

54 नोहाच्या दिवसात, त्यांच्या दिवसात, दैहिक मंडळीकडे पाहा. ते काय होते? वैज्ञानीक, बांधकाम करणारे, हुशार मनुष्य. परंतु निवडलेले, हनोख आणि नोहा, मेंढपाळ आणि शेतकरी होते, नम्र, अशिक्षीत, चलाख नव्हते, परंतु त्यांच्या देवाला ओळखणारे; त्यांच्यात काहीतरी, चालत, बोलावीत होते. आपण त्याकडे नंतर जाऊ.

आता, म्हणून यहोशाफाट म्हणतो, "तेथे कोणीतरी संदेष्टा नाही काय?"

55 होय, अर्थात त्यांच्यात दैहिक होते. "खचितच, आपल्यातही आहेत. माझ्याकडे येथे एक सेमिनरी आहे, तशांनी भरलेली."

56 चारशे पुढे आले. आता, ते नास्तिक नव्हते. ते यहोवा–देवाची भक्ति करणारे होते. पुढे आले, ते म्हणाले, "आपण थोडा वेळाने एकत्र येऊ आणि आपण भविष्यवाणी करु." आणि म्हणून ते सर्व एकत्र आले. आणि ते परत आले, "देवाच्या वचनासह," आणि ते म्हणाले, "**प्रभू परमेश्वर असे म्हणतो**." इस्त्राएली संदेष्टे. "**प्रभू परमेश्वर असे म्हणतो**. चढाई करुन जा, परमेश्वर तुझ्याबरोबर आहे. आणि तू रामोथ गिलाद घेशील कारण ते खरोखरीच इस्त्राएलाचे आहे." आणि मुख्य पुरुषांमधील एकाने दोन मोठी लोखंडाची शिंगे करुन आणली होती, दर्शक म्हणून, आणि तो त्याने ढकलत गेला. त्याने म्हटले, "ह्या शिंगांनी तू इस्त्राएलला...किंवा अरामी लोकांस. रामोथ–गिलादा बाहेर काढशील."

परंतु, यहोशाफाट, त्याच्यामध्ये काहीतरी!

57 माझी आशा आहे की परमेश्वर ह्या गोष्टी तुमच्या हृदयात घालीत आहे. तेथे काहीच नाही जे तुम्ही स्वतः तुम्हाला शिकवू शकता. तुम्ही स्वतःहून वाचू शकता असे काहीच नाही. तो परमेश्वर आहे, जो निवडीद्वारे, तुमच्यासाठी हे करीत आहे. "हे धावपळ करणाऱ्यावर नव्हे किंवा इच्छा...तो परमेश्वर आहे जो दया करतो."

58 यहोशाफाट म्हणाला, "ते चांगले वस्त्र परिधान केलेले पुरुष आहेत." निसंशय तो अशासारखे बोलला असेल. "ते ज्ञानी आहेत, आणि आजपर्यंत ऐकलेल्या लोकांपेक्षा हुशार आहे. ते त्या काळचे शिक्षित होते. ते एकमताने उभे राहीले. त्यांच्यामध्ये, मोठे ऐक्य होते. आणि ते हुशार आहेत, आणि त्यांच्याकडे खूप सत्य आहे."

59 सर्व चुकात सत्य आहे. सर्वात मोठे खोटे जे आजपर्यंत बोलले गेले होते त्यात नव्वद...[टेपवर रिकामी जागा—सम्पा.] टक्के सत्य होते, ते खोटे जे सैतानाने हव्वेला सांगितले.

60 "होय, तेथे खूप सत्य आहे जे ते सांगत होते, परंतु तेथे आणखी कोणी नाही का?"

61 बरे, तो मनुष्य काय बोलला असे तुम्हाला वाटते? "जेव्हा आपल्याकडे येथे चारशे आहेत, सर्वात हुशार, उत्तम? ते तसे नाही जे रानात अर्धनग्न भटकतात, आणि मेंढराचे कातडे पांघरलेले, किंवा तसे काही. ते असे पुरुष आहेत ज्यांना मी भरवतो, माझ्याकडे शिक्षीत आहे. ते असे पुरुष नाहीत ज्यांना त्यांची ए. बी. सी. ठाऊक नाही. ते विद्वान आहेत, आणि त्यांना सर्वकाही माहीत आहे. ते भविष्यवाणीच्या गुंडाळ्या वाचतात व रात्र–दिवस तसे राहतात. त्यांना काय सत्य ते ठाऊक आहे. मी त्यांना तयार केले आहे. आणि ते येथे एकमताने उभे राहून, त्यांच्यातील चारशेजण, म्हणत आहेत, 'चढाई करुन जा, परमेश्वर तुम्हाबरोबर आहे.'"

62 परंतु जर मी यहोशाफाटाचे मन काही मिनीटांसाठी वाचू शकलो असतो तर, "तेथे असे काही आहे ज्याची नोंद केलेली नाही," तो म्हणेल, "तेथे असे काही आहे जे योग्य वाटत नाही. तेथे याखेरीज दुसरा कोणीतरी नाही का?"

63 “होय,” त्याने म्हटले, “होय तेथे आणखी एक मनुष्य आहे, पण तो ह्या समुहाचा नाही. तो वेगळ्या प्रकारचा मनुष्य आहे. तो एक विश्वासघातकी आहे.” तो याकोबासारखा आहे. “परंतु आपण त्याला विचारु. ते म्हणतात तो एक संदेष्टा आहे. परंतु मला त्याविषयी संशय आहे, कारण तो मला नेहमी शापच देतो, *हे, ते*, सांगत असतो, किंवा *इतर* किंवा तो माझ्याविषयी अनुकुल संदेश कधीही देत नाही.” तो कसे करु शकतो? समजले.?

64 म्हणून ते म्हणाले, “त्याला जाऊन घेऊन या. तो इम्लाचा पुत्र आहे.” म्हणून ते गेले आणि त्याला घेऊन आले.

65 आणि कोणीतरी त्याला रस्त्यात भेटला, म्हणाला, “आता तू तेच बोल जे ते बोलत आहे. तू त्या समुहाशी एकमतात असला पाहीजे. जर तू नसलास, तर तुझा नाश होवो!”

66 त्याने म्हटले, “परमेश्वर जे काही मला सांगेल तेच मी बोलेन, आणि दुसरे काही नाही.”

67 मग तो तेथे गेल्यावर, त्यांनी त्याला एक रात्र दिली, तो म्हणाला, “जा, परंतु सर्व इस्त्राएल लोक मेंढपाळावाचून असलेल्या मेंढरांसारखे विखरले आहेत असे मला दिसले.”

आणि अहाब म्हणाला, “मी आपणास सांगितले नव्हते काय?”

68 आता, ते चारशे विरुध्द एक असे होते. चारशे प्रशिक्षित, हुशार, शिक्षीत, ज्ञानी पुरुष एका लहान अडाणी माणसाविरुध्द, ज्यास आपण, मिखाया म्हणू. एक मनुष्य, परंतु तरीही त्या एका मनुष्याकडे देवाचे वचन होते, हा फरक होता. त्यांच्यातील प्रत्येकजण खोटा होता, ते खोटे म्हणून सिध्द झाले. मीखाया इतका वेगळा का होता? वेगळे असण्यासाठी त्याला गरीब असणे गरजेचे होते काय? नाही. तो...मीखाया कशामुळे वेगळे होता, तो वचनाबरोबर राहीला. तो देवाच्या वचनाबरोबर राहिला.

69 आता, हे अभिवचन दिले आहे, ह्या दिवसात, “परमेश्वर त्याच्या आत्म्याचा वर्षाव करील.” दानीएलाद्वारे हे वचन देण्यात आले, की, “ते लोक, त्या दिवसात जेव्हा तो पाषाण पुतळ्याच्या पायावर आदळला, लोक जे त्यांच्या देवाला ओळखतात ते पराक्रम करतील.” भविष्यवाणी नंतर भविष्यवाणी! आणि सर्व सेमिनऱ्या, हे जग ते बाहेर काढू शकत नाही. देव ते कसेही करुन करणार आहे, आणि लोक त्याचे अनुकरण करणार आहेत. समजले? दैहिक आणि...स्वाभाविक मंडळी आणि दैवी मंडळी. तुम्ही पाहा, वचन वेगळे करते.

70 तोच याकोबाने विचार केला, “कसेही करुन का होईना, मला ठाऊक आहे की मला कधीच आशीर्वाद मिळणार नाही जोपर्यंत तो ज्येष्ठत्वाचा हक्क मी प्राप्त करुन घेत नाही. तो ज्येष्ठत्वाचा हक्क मी प्राप्त करुन घेणार.”

71 आणि, परंतु एसावाने त्याचा द्वेष केला, आणि त्याच्या संततीनेही तेच केले, अजूनही ह्या दिवसापर्यंत. ते त्याचा द्वेष करतात. हे नेहमी असेच आहे.

72 जेव्हा केव्हा संजीवन होते, ते सदैव जुळ्यांना उत्पन्न करते. ही कठोर प्रतिक्रिया आहे, पण ते सत्य आहे. जेव्हा तेथे इसहाक आणि रिबकेपासून जन्म झाला, त्याने जुळ्यांना उत्पन्न केले. जेव्हा हे जग निर्माण केले गेले तेथे जुळे उत्पन्न केले गेले, दोन झाडे. आणि जेव्हा काईन आणि हाबेल जन्माला आले. त्याने दोन उत्पन्न केले. जेव्हा इश्माएल आणि इसहाक जन्माला आले, त्याने दोन उत्पन्न केले. त्यांच्यातील एक, स्वाभाविक, (त्यांतील एक पृथ्वीचा होता); दुसरा दैवी होता. आणि जर स्वाभाविक मनुष्याकडे पाहीले, विद्वान; दुसरा आत्म्याने चालतो. ते सदैव तसेच आहे. जेव्हा लुथरन मंडळी पुढे आली...

73 प्रथम, आपण पेंटेकॉस्टल मंडळ्या घेऊया. पेंटेकॉस्टल मंडळ्याच्या जन्माकडे पाहूया. पेंटेकॉस्ट, तीने महान, सामर्थ्यशाली संजीवन आणले ज्याने त्यावेळचे जग हादरुन टाकले. पेंटेकॉस्टनंतर फार काळ झाला नाही जेव्हा पौलाने म्हटले, "त्यांच्यातून अशी माणसे उठतील, जे विपरित गोष्टी बोलतील आणि लोकांना परमेश्वरापासून बहकवतील." आणि तसेच त्यांनी केले. ते दोन उत्पन्न करतात.

74 जेव्हा लुथरन मंडळी जन्माला आली, मार्टीन लुथरने एक आत्मिक संजीवन आणले. फार काळ झाला नाही येथे एसाव आला, लगेच त्याच्यामागे, आणि संघटित झाला आणि त्याने जुळे उत्पन्न केले.

75 त्यानंतर मेथॉडिस्ट आले, जॉन वेस्ली, एक आत्मिक संजीवन. आणि त्यानंतर, संघटना आली, ते संघटीत झाले. आणि तेथे जुळे उत्पन्न झाले.

76 आणि त्यानंतर, पेंटेकॉस्टल आले, एक संजीवन आणि आता ते संघटीत झाले आहे, आणि आता त्यांची संघटना झाली आहे. आणि ते जुळे उत्पन्न करते.

77 परंतु जीवंत देवाचे आत्मिक बीज जरी त्याला प्रवासी व्हावे लागले, त्याला झुडूप व्हावे लागले, ते सदैव विभक्त करते. एसाव याकोबाबरोबर जास्त काळ राहू शकला नाही. जेव्हा याकोबाने तो ज्येष्ठत्वाचा हक्क प्राप्त केला (प्रभूची स्तुती होवो), तो विभक्त झाला. आणि जेव्हा एक मनुष्य…मी ह्या गोष्टीची पर्वा करीत नाही की तुम्ही कोणत्या मंडळीचे आहात, जर ते दैहीक आहेत, आणि तुमचे सहकारी जे ती मंडळी चालवतात, ते लोक त्यांच्यासह तुम्ही पत्ते खेळता, आणि तुमच्या वाङ्मय संस्था, आणि असेच पुढे; जेव्हा तुम्ही ज्येष्ठत्वाचा हक्क प्राप्त करिता, जी गोष्ट, तुमच्या अंतःकरणात देवाविषयी भूक निर्माण करते, जेव्हा तुम्ही ती प्राप्त करता. ती तुम्हाला विभक्त होण्याविषयी सांगते. "त्यांच्यातून निघून बाहेर या, आणि वेगळे व्हा, परमेश्वर म्हणतो," वेगळे व्हा!

78 मंडळी स्थिर होते. पाहा, ती पुढे जाऊ शकत नाही. एसाव हा आजच्या दैहिक विश्वासणाऱ्याचे उत्तम उदाहरण आहे, जगावर कधीही विजय मिळवू शकत नाही. त्यांना आजही मद्यपानोत्सव करणे, त्यांचे नाचणे, त्यांचे हात, नखे ह्याची निगा राखणे, श्रृंगार करणे आणि, स्त्रीया, त्यांचे चेहरे रंगवितात, आणि—आणि त्यांचे केस कापतात आणि—आणि ते लहान, तोकडे कपडे परिधान करितात; आणि—आणि पुरुषांना पुलखोल्यामध्ये जाणे आवडते, आणि—आणि धुम्रपान करणे, आणि लहान घाणेरडे विनोद करणे आवडते. आणि तरीही मंडळीशी जोडलेले आहेत. ते कधीही ह्या गोष्टीवर विजय मिळवू शकले नाही. एसाव ही शकला नाही. परंतु तरीही, धार्मिक होण्यासाठी, त्याला ह्या बौध्दीक संकल्पनेत जुळवून घ्यावे लागते. तशाप्रकारे आजची मंडळी करीत आहे. "आपण एक संघटना बनवूया. आपण आपल्याला एकत्रित ठेवूया. आपण एक कुळ बनवू, किंवा एक गट, किंवा त्यासारखे काही बनवूया."

79 आणि अशाच प्रकारे आजची मंडळी चालत आहे, आत्मिक आणि दैहिक तशीच आहे. ती बदलली नाही, आणि कधीही बदलणार नाही.

80 देवाची पवित्रता. परमेश्वर, देव असल्याकारणे, स्वतःला प्रगट करतो. जर तेथे पापी नसता, तर तेथे कधीही…तो कधीही एक तारणारा बनला नसता. परंतु तो सुरुवातीलाच एक तारणारा होता, म्हणून तेथे कोणीही नाश पावले नव्हते. आणि त्याचा स्वतःचा गुणधर्म एक तारणारा म्हणून एका पाप्याला प्रक्षेपित करतो, तेथे असे काहीतरी असले पाहीजे जे वाचले गेले पाहिजे. तेथे कोणीतरी वाचले जाण्यासाठी, प्रथम कोणीतरी हरवले पाहिजे. आणि त्याचे नीतीमत्व आणि त्याचे पवित्रपण! जर तेथे कोणी आजारी व्यक्तीच नसता, तर तो कधीच एक—एक आरोग्यदाता म्हणून आला नसता. परंतु सुरुवातीपासून, आणि

सुरुवातीहून, तो सुरुवातीअगोदर होता. तो आरोग्यदाता होता. जेव्हा तेथे कोणीही आजारी नव्हता, म्हणजे त्याने आजारी माणसाला प्रक्षेपित केले, की त्याने त्यांना बरे करावे, त्याला आरोग्यदाता बनवावे.

81 त्याच पवित्र आयामांतून तारण आले, शाप आले. त्याच आई आणि वडिलांतून याकोब प्रक्षेपित झाला, एसाव प्रक्षेपित झाला. समजले? तो परमेश्वर आहे. तो त्याची योजना बदलू शकत नाही. त्यांना तसेच चालावे लागते. सारी सृष्टी त्यात सहकार्य करील. तिला करावे लागेल. मला काय म्हणायचे आहे तुम्ही समजत आहा? त्यात हालचाल होत आहे. तेथे काहीतरी हरवले पाहिजे, काहीतरी वाचले जावे म्हणून. आणि जर तेथे असे काही नसते, तो त्याचे...त्याला तारणारा बनवते. लोंढा लोंढ्याला बोलावतो.

82 ज्याप्रमाणे एक लहान मुलगा ज्यावषयी मी नेहमी बोलतो, पेन्सिलमधला खोडरबर खात असे, आणि सायकल चालवित असे, त्याला गंधकाची गरज होती. आणि जोपर्यंत त्याच्यात असे काहीतरी होते जे त्याला गंधकाविषयी, फार तीव्र इच्छा होती, तेथे कुठेतरी प्रथम, गंधक असला पाहिजे. तेथे गंधक असला पाहिजे, त्याच्यामध्ये ती तीव्र इच्छा असण्याअगोदर. आणि ते, गंधक, त्याला प्रक्षेपित करते, तेव्हा तो गंधकाकडे जातो.

83 तशाच प्रकारे देव एक तारणारा आहे. आणि तेथे काहीतरी हरवले पाहिजे जे त्याने मिळवावे, त्याला एक तारणारा बनवण्यासाठी. हेच सर्व तो करीत आहे, देव खेळत आहे. सर्व गोष्टी, ज्या त्याच्यात होत्या; त्या एका प्रचारकामध्ये नव्हत्या, एका मंडळीत नव्हत्या, एका संघटनेत नव्हत्या. परंतु देवात होत्या, ह्यासाठी की निवड परिपूर्ण ठरावी. समजले? ते त्याच्यामध्ये आहे. होय. ते लुथरन...

84 आणि नंतर आपण आणखी एक विभक्त होणे पहातो, ते अब्राहाम आणि लोट होते. ते भाऊबंध होते. परंतु लोट दैहिक विचारांचा होता. तो नेहमी मोठ्या गोष्टींच्या मागे असे, असे काही खोट्या दिमाखासह. एका माकडासारखे, जसे मी म्हणतो, तो नेहमी तेजस्वी गोष्टीकडे जाऊ पहातो. त्या आत्म्याने आजही लोकांना सोडले नाही. ते त्याकडे पोहोचतील...ते शहराकडे जातात आणि ते अशा लहान झोपडीकडे येणार नाहीत. समजले? त्यांना ह्या शहरात सर्वोत्कृष्ट चर्च हवे आहे, फार विद्वान पाळक, जेथे चांगले वस्त्र परिधान केलेले लोक जातात; जेथे महापौर जातो. तेथे आजही एसावाचा आत्मा आहे, सुरुवातीस खरोखरीच त्यांच्याकडे ज्येष्ठत्वाचा हक्क होता, ते स्वतःला मंडळी म्हणत होते, परंतु ते तो गमावून बसले. कारण त्यांनी तो तुच्छ लेखला. तुम्ही त्यांना असे लोक म्हणू शकत नाही जे त्यांच्या गुडघ्यावर जातात, देवाकडे रडतात व याचना करतात, आणि बाहेर जातात. आणि आरोग्यसभा भरवतात, आणि जगाच्या छळापुढे उभे राहतात, पवित्र आत्मा मिळवतात. आणि ते—ते तसे करणार नाही. ते तो तुच्छ लेखतात. ते त्यांना म्हणतात “देव-वेड्या लोकांचा समुह.” जे बायबल सांगते तेच ते करतात. तेच ते करतात कारण हा त्यांचा स्वभाव आहे. तो एक स्वभाव आहे. जसा एक कावळा आणि एक कबुतर, दोन स्वभाव. त्यांची तीव्र इच्छा असते तेच ते असतात. ते दुसऱ्याकडे कधीच (कधीच) पाहणार नाहीत, कारण त्यांचा जन्म ते पहाण्यासाठी झालेलाच नाही.

85 आणि दुसरा, तुम्ही त्याला दूर ठेवू शकत नाही, कारण ही देवाची निवड आहे. तो एक आत्मिक पुरुष किंवा एक आत्मिक स्त्री बनण्यासाठी जन्माला आला आहे. काहीतरी त्याच्यामध्ये आहे जे त्यासाठी त्याला बोलावते. होय, मी—मी आशा करतो की अशा ठिकाणी आलो आहोत जेथे आपण, मला—मला काय म्हणायचे आहे तुम्ही समजत आहात, आता ते ठळकपणे दाखविण्याद्वारे. आता अब्राहाम...

86 लक्षात घ्या, जोपर्यंत ते एकत्र होते, दैहिक मंडळी आणि आत्मिक मंडळी, त्यांना कधीच आशीर्वाद मिळाला नाही. याकोबाला कधीच आशीर्वाद मिळाला नाही. जो पर्यंत तो एसावापासून विभक्त झाला नव्हता. आणि अब्राहामाला कधीच आशीर्वाद मिळाला नाही जोपर्यंत तो लोटापासून वेगळा होत नाही.

87 लोटाची स्वत: ची लहान प्रार्थना सभा त्याच्या मंडळीत होत असे. त्याच्या पुत्रांना व कन्याना शिकवीत होता, आणि त्यांना. परंतु तो असे जीवन जगला, जोपर्यंत, जेव्हा तो त्यांना अंत समयाविषयी सांगत होता, ते त्याच्यावर हसले.

88 तीच गोष्ट आज आहे! तुम्ही दैवी आरोग्य आणि देवाचे सामर्थ्य, आणि अशा गोष्टी बोलता, ते त्यावर हसतात. तो तोच आत्मा आहे. ते दोन महान आत्मे आहेत, धार्मिक रीतिने, जग त्यांच्या मुठीत आहे; विश्वासी आणि अविश्वासी, विश्वासी आणि ढोंगी विश्वासी, एक दुसऱ्याची नक्कल करतो. आता जेव्हा अब्राहामाने स्वतःला विभक्त केले…

89 तुम्ही येशूकडे लक्ष दिले का? त्याच्या आगमनाविषयी, दुसऱ्या आगमनाविषयी बोलताना, त्याने म्हटले, "जसे नोहाच्या दिवसात होते, ते खात होते, पित होते, लग्न करुन देत होते, आणि लग्न करुन घेत होते," परंतु जेव्हा तो लोटाच्या दिवसांविषयी बोलला, त्याने त्याविषयी कधीच काही सांगितले नाही. "जसे लोटाच्या दिवसात." ते प्रकटीकरणासाठी आहे.

90 लोटाच्या दिवसात काय झाले ते पाहूया. लोट तेथे सदोमात होता, तेथे व्यवस्थित स्थिरस्थावर झाला होता, बौध्दिक रितीने, शहरांतील एक मोठा व्यक्ती बनला होता, एक न्यायाधिश, प्रवेशद्वाराच्या आत बसत असे आणि लोकांचा न्याय करीत असे. त्याची पत्नी त्या शहरांच्या सर्व संस्थांची सभासद होती. आणि त्याच्या मुली, आणि त्यांच्यातील सर्वांनी, ख्यातनाम व्यक्ती, विद्वान, उच्च शिक्षित, हुशार, थट्टेखोर, व्यक्तींशी लग्न केले होते. आणि अब्राहाम एका ओक झाडाच्या खाली तंबूत राहात असे. परंतु एके दिवशी दोघांकडे भेट दिली.

91 आणि तेथे एक विद्वान प्रचारक गेला आणि प्रचार केला, आणि त्यांना बाहेर बोलावले. पाहा—संदेशाकडे पाहा, "बाहेर या," त्याने लोटाला म्हटले.

92 आणि त्याला कधीच बाहेर बोलावले गेले नसते जर तेथे अब्राहामाची दया नसती. म्हटले, "जर मला पन्नास पुरुष आढळले, तर तू त्यांची गय करणार नाहीस काय? मला तीस पुरुष सापडले तर? जर मला…जर मला दहा सापडले?" तोपर्यंत तो जाऊ शकला. आणि त्याला दहादेखील सापडले नाही.

93 आश्चर्य नाही, "जसे नोहाच्या दिवसात होते." लक्षात ठेवा, नोहा हा मंडळीचे दर्शक नव्हता; हनोक होता, तो महासंकटाच्या काळातून गेला नाही, परंतु महासंकट येण्याआधी तो बदलला गेला. हनोक घरी गेला, तो महासंकटाच्या काळातून गेला नाही. नोहा त्यामधून गेला.

94 आता, आता नीट लक्ष द्या जेव्हा आपण ह्यामध्ये जात आहोत. पाहा कोणत्या प्रकारचे चिन्ह अब्राहाम आणि त्याच्या कुटूंबाकडे आहे. त्यांच्याकडे दैवी चिन्ह आहे. "अब्राहाम!" त्याला कसे कळले की तो अब्राहाम होता? "तुझी पत्नी सारा कुठे आहे?" त्याला कसे कळले तो विवाहीत होता, किंवा त्याला एक पत्नी, सारा आहे?

"ती तंबूत आहे."

95 आता एक मनुष्य तेथे बसलेला आहे. मांस खात आहे. दूध पीत आहे, आणि सपीठ भाकरी खात आहे. "तुझी बायको सारा कोठे आहे?" त्याला ती गोष्ट कशी कळली?

त्याला ते कसे कळले? त्याचा विचार करा. तुम्ही म्हणता...तुम्ही आत्मिक लोक, हे तुम्हाला समजू द्या. त्याला ते कसे कळले, जेव्हा तो एक अनोळखी असल्यासारखी कृती करत होता, त्याच्या वस्त्रावर धूळ होती?

आणि जेव्हा अब्राहाम म्हणाला, “ती पाहा डेऱ्यात आहे, तूझ्या मागे.”

96 आणि त्याने म्हटले, “मी...” “मी, मी,” पुरुषवाचक सर्वनाम. मी हा मनुष्य देव स्वतःला देहात प्रगट करीत आहे. देव! अब्राहामाने त्याला एलोहिम म्हटले. “मी, मी तुजकडे परत येईन. मी माझे अभिवचन पाळेन. आणि पुढल्या वसंत ऋतुत, मी खात्रीने तुजकडे परत येईन, आणि तुला मुलगा होईल ज्याविषयी मी तुला सांगितले आहे.” आणि अब्राहाम, शंभर वर्षाचा; सारा, नव्वद वर्षांची.

97 आणि सारा, डेऱ्यात; चार लहान तंबू होते, मागे मुख्य डेऱ्यात बसली होती. पडद्यामागे, ती ऐकत होती. तीने ते ऐकले. आणि सारा मनातल्या मनात हसून म्हणाली, “मी, जख्ख म्हातारी झाले आहे, व माझा धनीही, वृध्द झाला आहे, तर मला आता हे सुख मिळेल काय, तरुण विवाहीतांसारखे? ओह, हे कसे होऊ शकते?” आणि ती हसली.

98 त्याची पाठ तंबूकडे होती. त्याने म्हटले, “ती का हसली?” होय, भावा, तेथे तू आहेस!

99 दैहिक मंडळीकडे पाहा ज्यांना सुवार्ता प्रचार केली जात आहे. ह्या काळचे बीली ग्राहम आणि ते तेथे प्रचार करीत आहेत, “त्यातून बाहेर निघा!” परंतु ते आले का? नाही. फार, फार, फार थोडे.

100 अब्राहामाच्या समुहाला पाहा, बाहेर बोलावलेले. आता लक्ष द्या. आणि त्याने त्याला हे चिन्ह दिले, आणि त्याने त्याच्यावर विश्वास ठेवला. आणि ते त्याच्या समोरुन निघून गेले. ओह, असेच सदैव निवडलेल्याचे विभक्त होणे आहे!

101 आता, हे दोन आत्मे. मी घाई करीत आहे. घाई करीत आहे ह्यासाठी की तुम्ही त्या ठिकाणी यावे जेथे मी तुमचे लक्ष वेधू इच्छितो. हे दोन समुह एकत्रित जोडले गेले आहेत, ह्या सर्व युगांमधून, अगदी सुरुवातीपासून; दैहिक मंडळी, आत्मिक मंडळी. ते जुन्या करारात होते, ते नविन करारात होते, आणि ते आजही आहे.

102 आता, जवळ—जवळ दोन हजार वर्षांपूर्वी, ते आले, आणि ते मनुष्यामध्ये आले: त्यांतील एक, येशू ख्रिस्त; दुसरा, यहुदा इस्कर्योत. आता, येशू त्याचे आगमन, त्याचे दुसरे आगमन, ह्याबरोबर जोडत आहे, हे दोन आत्मे खूप वेगळे असतील जे ते मागे होते. आता येथेच मी तुम्हाला तुमची—तुमची गौरवाची वस्त्रे घालू इच्छितो. हे दोन आत्मे वेगळे असतील. कारण, सैतान आला आणि त्या मनुष्यामध्ये राहिला जो एक मंडळीचा सदस्य होता, यहुदा इस्कर्योत, दैहिक मंडळीत राहिला, आणि सदैव तो मंडळीचा एक मित्र होता, परंतु आत आला आणि—आणि फसवले, किंवा विचार करीत होता की तो त्याच्या भावाला फसवीत आहे. तो आला आणि त्यांच्यातील एक होता. ज्यांनी देवाच्या चांगल्या गोष्टींची रुची घेतली, आत्म्यामध्ये चालला, तसेच दिसत होते, बाहेर गेला आणि सुवार्तेचा प्रचार केला, आणि भुते घालवली. परंतु त्याच्यामध्ये खोल, सर्व समयी, तो यहुदा होता, सुरुवातीपासून बायबल म्हणते, “तो नाशाचा पुत्र म्हणून जन्मला होता.”

103 आता लक्षात ठेवा, तेथे मागे दैहिक मंडळी होती, एसाव, परुशी आणि सदुकी.

104 परंतु पाहा हा मनुष्य स्वतःविषयी विचार करतो...तो थोडावेळ ह्या संदेशाबरोबर चालेल, परंतु त्याची इच्छा नव्हती की तो पूर्णपणे अनुसरावा. ते आत्मे पाहा?

येशूने म्हटले, “ते इतके सत्याच्या जवळ असतील, ते निवडलेल्यांनाही फसवतील,” निवडलेले, जर तुम्ही ह्याकडे लक्ष द्याल, “साधेल तर”. परंतु ते शक्य होणार नाही. पाहा, ते फसवतील.

105 आता लक्ष द्या, फक्त दैहिक मंडळी नव्हे, एक तेथे होती, नेहमीची दैहिक मंडळी, एसाव समुह.

106 आता आपल्याकडे यहुदा समुह आहे, जो फार फसवा आहे, खूप अधिक फसवा आहे, थेट आशीर्वादाच्या हाती येतो. अगदी इब्रीकरांस पत्र, 6 आणि 10 प्रमाणे, त्याने कसे म्हटले, “ज्यांनी देवाच्या सुवचनाची व येणाऱ्या युगाच्या सामर्थ्याची रुची घेतली, आणि ह्या सर्व गोष्टी केल्या; जर...आणि जेव्हा जर त्यांना सत्याचे ज्ञान प्राप्त झाले, आणि ते जर हेतुपुरस्सर पतीत झाले तर.” “हेतुपुरस्सर”, ते काय आहे? “कराराचे रक्त अपवित्र मानले, ज्याद्वारे ते पवित्र झाले होते, एक अपवित्र गोष्ट.”

107 मला तुम्हाला एक उदाहरण देऊ द्या. येथे हे आहे. येथे एक मनुष्य आहे, तो एक चांगला मनुष्य आहे. तो बोलावलेला आहे, त्याला त्याच्या अंतःकरणात वाटते की त्याला एक सेवक बनण्याची इच्छा आहे. ठीक आहे, त्याने येशूला व्यक्तीगत तारणारा म्हणून स्विकारले आहे. तो एक चांगला मनुष्य आहे, कोणीही त्याच्याविरुध्द काहीच बोलू शकत नाही. काही काळानंतर, पवित्रीकरणाचा विषय. त्या मनुष्यामध्ये वासना येऊ लागली जेव्हा तो स्त्रीयांकडे बघे. तो...हे त्याच्यामध्ये आहे समजले? आणि तेव्हा, दुसरी गोष्ट, जो धुम्रपान करायला लागेल, आणि त्याला धुम्रपान करायची इच्छा झाली. कदाचित त्याला जुगार खेळावा वाटेल. कदाचित त्याला आणखी काही वाईट गोष्ट करायला वाटेल. त्याला माहीत आहे. त्याने ह्या गोष्टी करु नये, म्हणून तो म्हणतो, “हे परमेश्वरा, येशूचे रक्त मला लाव. आणि मला पवित्र कर.”

108 आणि तो पवित्र झाला. तो ओरडू शकतो. प्रभूची स्तुती करु शकतो. काही गोष्टी करतो, बाहेर जातो आणि गोष्टी करतो. लक्षात ठेवा, येशूने म्हटले त्या दिवशी असे लोक असतील. “पुष्कळ जण येतील आणि म्हणतील, ‘प्रभू मी भविष्यवाणी, प्रचार केला नाही काय? मी तुझ्या नावाने, भूते काढली नाहीत काय?’” येशूने म्हटले, “‘अहो अनाचार करणाऱ्यांनो, मला तुमची ओळख नव्हती.’” पहा, तेथे ते आहे.

109 आता ह्याकडे लक्ष द्या. आपण शेकडो दशलक्ष केस तयार करण्यासाठी, सुवार्तेच्या तीक्ष्ण धारेकडे येत आहोत, “कोणत्याही दुधारी तरवारीपेक्षा तीक्ष्ण असून, सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनांतील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे!” हालेलुयाह! परमेश्वरा, ती आरपार जाऊ दे. “मनातील विचारांचे परिक्षक आहे.” तीच सुवार्ता आहे, देवाचे सामर्थ्य. देवाचे वचन प्रगट करणे हेच शुभवर्तमान आहे.

तुम्ही म्हणता, “बायबल म्हणते. तेच—तेच देवाचे वचन आहे.”

110 तर, वचन प्रगट करणे हेच शुभवर्तमान आहे. शुभवर्तमान आपल्याकडे वक्तृत्वाच्या श्रेष्ठतेने आले नाही, परंतु आत्मा व सामर्थ्य ह्याचे निदर्शक, म्हणून सामर्थ्य प्रगट करण्यासाठी, शुभवर्तमान जीवंत करण्यासाठी आले.

111 जेव्हा मी भारतात गेलो, मेथडिस्ट मंडळीचा—चा आर्चबिशप बाहेर आला, म्हणाला, “भाऊ ब्रॅन्हम, आम्हाला मिशनरीविषयी काही जाणून घ्यायचे नाही. आम्हाला तुमच्यापेक्षा बायबलविषयी अधिक ज्ञान आहे.” म्हणाला, “आम्ही एक मंडळी होतो. आणि तुमचे राष्ट्र अस्तित्वात येण्याच्या दोन हजार वर्षे आधी स्थिरस्थावर होतो.” ते बरोबर आहे. परंतु म्हटले, “आम्ही ऐकले की परमेश्वराने तुला भेट दिली आणि एक बक्षिस आणले की जे हे बायबल जीवंत करू शकते.” म्हणाला, “त्यातच आम्हाला

कुतुहल आहे." ओह, माझ्या देवा! पहा, तो मनुष्य एक पुत्र होता, नातू नव्हता, जसे दाविदाने म्हटले. समजले? "आम्हाला जाणून घ्यायचे आहे. हे खरे आहे का?"

112 मी म्हटले, "खचितच, हे खरे आहे. 'येशू ख्रिस्त हा काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे.'"

113 आता, त्याच्याकडे लक्ष द्या, दैहिक मंडळी आत्मिक मंडळीचा छळ करीत आहे. आता, आम्हाला आढळते की यहुदा एक भाऊ, एक भाऊ असण्याचे ढोंग करीत होता, आणि मग पुढे जाऊन शेवटी अंत येणार आहे.

114 आता ह्या तरुण प्रचारकाकडे पाहा. तो त्या स्थितीत आला, तो म्हणाला, "प्रभू, मी स्त्रीयांकडे पाहात होतो. मी ते करायला नको होते. मी, तुला माहीत आहे, जगातील गोष्टी करीत होतो. मी ते करायला नको होते. मी माझे पैसे घोड्याच्या शर्यतीवर खर्च करीत होतो. मी—मी ते करायला नको होते. मी—मी प्रत्येक रात्री चित्रपटास जात होतो. मी ते करायला नको होते. मी अश्लील फोटो आणि अशा गोष्टी पाहाण्यात आनंद भोगला, माझ्या खोलीत सुंदर तरुणींची चित्रे आहेत. मी ते करायला नको होते. त्या जगाच्या गोष्टी आहेत. प्रभू, मला पवित्र कर!"

115 आणि प्रभू म्हणाला, "ठीक आहे, मी ते करीन." त्याने येशू ख्रिस्ताचे रक्त लावले आणि त्याला पवित्र केले.

116 मग, जेव्हा त्याने ते केले, एके दिवशी तो जात होता आणि त्याने काहीतरी ऐकले. तो जवळ गेला आणि ऐकले. त्याने पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याविषयी ऐकले, आत्म्याने भरणे. मग त्याने त्यामध्ये पाहीले, "ओह, माझ्या देवा, ते किती अद्भूत आहे! परंतु ते माझी सेवकाई नष्ट करील, जर मी त्याविषयी प्रचार केला. त्यामुळे माझी आई मला घरातून घालवून देईल. जर मी त्यात गेलो तर ते मला माझ्या मंडळीतून काढून टाकतील. होय, मी त्यापेक्षा त्यापासून दूर जाईन. परंतु मला त्यांतून पाहून दे. होय, ते सत्य आहे, बायबल."

117 तर, काही प्रसिध्द सेवक, जगप्रसिध्द, अलीकडे (एक मनुष्य जो मजबरोबर प्यूटोरिकोमध्ये होता) त्याच्या गुडघ्यावर, अन्यभाषेत बोलताना लंडन, इंग्लंड येथे आढळला; एक शक्तीशाली मनुष्य, आजच्या जगातील महान सुवार्तिकांपैकी एक आणि हा मनुष्य, त्याचा भाऊ येथे मजबरोबर असतात, एक आत्म्याने भरलेला मनुष्य, त्याच्याकडे गेला आणि म्हणाला, "अरे भावा, हेच ते आहे."

118 त्याने म्हटले, "मला ते ठाऊक आहे. मला ते ठाऊक आहे. परंतु, पाहा, मला तुला काही सांगू दे."

119 त्याने म्हटले, "आता प्रचार कर. त्याचा प्रचार कर. हाच समय आहे. तुझ्या प्रभावाने, तू जगाला हलवू शकतो."

120 त्याने म्हटले, "नाही मी ते प्रचार करु शकत नाही. पाहा, ती मंडळी मला काढून टाकील. मी ते प्रचार करु शकत नाही. मी ते करु शकत नाही." अरे भावा!

121 "मिळाले असता...एकदा पवित्रीकरण झाले असता आणि सत्याचे ज्ञान मिळाल्यावर, त्यात पाहिल्यानंतर, कळले की ते सत्य आहे; आणि पतित झाले, ते देवाच्या पुत्राला नव्याने वधस्तंभावर खिळतात, आणि त्याचा उघड अपमान करितात, सुवार्तेची लाज धरतात."

122 पौल म्हणतो, "मला येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेची लाज वाटत नाही. कारण ती ज्यांचे तारण होत आहे त्याच्यासाठी देवाचे सामर्थ्य आहे." ते देवाचे सामर्थ्य आहे जे त्याच्या मंडळीत कार्य करीत आहे.

123 परंतु ते म्हणाले, “मी ते करु शकत नाही.” हा मनुष्य म्हणाला, “त्यांना मी पेंटेकॉस्टल वाटलो. त्यांनी मला केले…” त्याने म्हटले, “माझी—माझी प्रतिष्ठा धुळीत मिळेल.” अरे, भावा!

124 माझी प्रतिष्ठा काहीच नाही. मी त्याच्याविषयी विचार करतो. त्याची प्रतिष्ठा, ती महत्वाची आहे.

125 परंतु पाहा किती जवळ ते आले, तुम्हाला माहीत आहे, “त्यांनी कराराचे रक्त अपवित्र लेखले ज्याद्वारे त्याचे पवित्रीकरण झाले होते, ती गोष्ट जीने त्याला पवित्र केले आणि जगापासून वेगळे केले, आणि त्याला येथे आणण्याचा प्रयत्न करीत होती. आणि तेव्हा त्याने तिच्याकडे पाहीले, आणि त्याचे ज्ञान घेतले. त्यापासून पतीत होणे, तर पापाबद्दल पुन्हा यज्ञ व्हावयाचा राहीला नाही,” बायबल तसे म्हणते, “तर न्यायाची आणि विरोध्यांस गिळंकृत करील अशा अग्नीच्या भडक्याची एक प्रकारची धास्ती. ‘कारण सूड घेणे मजकडे आहे,’ असे प्रभू म्हणतो. मोशेच्या नियमशास्त्राचा कोणी भंग केला, तर त्याच्यावर दया न होता त्याला दोघांच्या किंवा तिघांच्या साक्षीवरुन मरणदंड होता. तर ज्याने देवाच्या पुत्राला पायांखाली तुडविले, जेणेकरुन तो स्वतः पवित्र झाला होता ते कराराचे रक्त ज्याने अपवित्र मानले, आणि कृपेच्या आत्म्याचा अपमान केला तो किती अधिक दंडास पात्र ठरेल म्हणून तुम्हास वाटते?” होय!

126 पाहा, आपण कोठे आहोत? येशूने म्हटले, “सावध असा.” पाहा यहुदा कसा होता? तो त्यांच्यासमवेत होता. तो एसाव होता, ह्या युगात त्याने अधिक केले तो फसवा, ढोंगी होता, ह्या युगासाठी अधिक केले. येथे तो पुन्हा शेवटपर्यंत आला, येशूचा भाऊ, एक ढोंगी भाऊ. परंतु त्याच्या अंतःकरणात, तो सदैव दैहिक मंडळीबरोबरच होता. कारण तेथेच त्याने येशूला विकले. त्याने येशूला विकले, त्याचा ज्येष्ठत्वाचा अधिकार, जसे एसावाने त्या जेवणासाठी केले. त्याने त्याचा ज्येष्ठत्वाचा अधिकार तीस चांदीच्या नाण्यांसाठी विकला.

127 कित्येक पुरुष आणि स्त्रीयांनी आज त्यांचे आत्मिक ज्येष्ठत्व काही प्रसिध्दीसाठी, काही जगाच्या लहान गोष्टीसाठी ज्यावर तुम्ही कधीच विजय मिळवला नाही; काही, स्त्रीया, श्रृंगार करतात आणि केस कापतात, तोकडे कपडे परिधान करतात; पुरुष त्यांचे घाणेरडे विनोद आणि धुम्रपान, काही जगिक गोष्टी. “जर तुम्ही जग आणि जगाच्या गोष्टींवर प्रीती करिता, तर देवाची प्रीती तुमच्यामध्ये नाही.” बायबल म्हणते.

128 मला तुम्हाला दुखवायचे नाही, परंतु आपण अंतिम समयात आहोत. आपण येत आहोत, आता, आपण आता त्या शीडीकडे लवकरच येत आहोत.

129 पाहा ती कशी आहे? ते ते करतात. ते पूर्वनियुक्त आहेत. ते कदाचित ढोंगी असतील. आणि त्याचबरोबर गोड आणि नम्र पण असतील, अगदी जवळ, जसे ख्रिस्ती, अगदी जवळ की ते निवडलेल्यांनाही फसवतील; परंतु त्यांच्या फळावरुन तुम्ही त्यांना ओळखाल.

130 एक स्त्री लहान विजार घातलेली, कधीच एका ख्रिस्ती स्त्रीसारखी मला दिसत नाही. बायबल म्हणते, “एका स्त्रीने तीचे केस कातरणे ही एक पापयुक्त आणि लाजिरवाणी गोष्ट आहे.” फक्त एका स्त्रीने बायबलमध्ये तिचा चेहरा रंगविला आहे, ती इजबेल होती.

131 पुरुषांविषयी कसे, तुम्ही पुरुष एक ख्रिस्ती पुरुष असले पाहीजे, आणि तुमच्या पत्नीला तुम्ही ते करु देता? जेव्हा देव तुम्हाला त्यासाठी जबाबदार ठरवील! पुरुषाला नाही! दैहिक! “होय, मी तेथे जाईन आणि त्या मंडळीत जाईन.” [टेपवर रिकामी जागा—सम्पा.] “…तुम्ही त्याचा विचार करा.” ते अगदी तसेच आहे जसे वचन म्हणते ते करतील, आणि ते अगदी तसेच आहे जे त्यांनी केले. आणि तेच ते करतील, तडजोड!

132 कोणीतरी म्हटले, “बीली, जर तू ते थांबवले नाहीस, तु सर्वांना घालवून देशील.”

133 तेथे एक गोष्ट आहे जी जाणार नाही, तो पवित्र आत्मा, कारण तो त्याचे वचन आहे. आणि खरा पुर्वनियुक्त विश्वासी निघून जाणार नाही, कारण हे त्याच्या जीवासाठी अन्न आहे. तो त्यावर प्रेम करतो. कुठलीही गोष्ट त्याला ह्यापासून दूर ठेवणार नाही. तो काहीही करील, जसा याकोब, परंतु त्याला ते ज्येष्ठत्व हवे आहे. तो तेथे उभा राहील. मी पर्वा करीत नाही. जर त्यासाठी त्याचे प्रत्येक मित्र सोडावे लागतील, जर त्याची नोकरी गमवावी लागेल, जर त्याला त्याच्या मंडळीचे सदस्यत्व सोडावे लागेल. जर त्याला सर्वांची किंमत चुकवावी लागेल. तरीही तो ते पकडून राहील, कारण त्याला काही करता येत नाही. त्याच्यामध्ये काहीतरी आहे, जे त्याला पुढे चालवत ठेवते, लोंढा लोंढ्याला बोलावील. होय, तेथे तुम्ही आहात, त्याच्यामध्ये काहीतरी आहे!

134 पाहा, तुम्ही बायबलमध्ये पाहू इच्छिता, आणि येथे या, उत्पत्तीमध्ये जा आणि पाहा ह्याची उत्पत्ती कुठे झाली, ते कुठे आले आहे. सर्व आत्मे आणि हालचाली आज उत्पत्तीकडे जात आहेत. तेच आपण केले आहे, ह्या गोष्टी ज्या तुम्ही पाहात आहे त्या सिध्द करण्यासाठी, मित्रांनो त्या विसरु नका, तुमच्या डोक्यावरुन जाऊ देऊ नका; त्या आणि तुमच्या मध्ये भिनल्या जाऊ देत. त्या देवाच्या गोष्टी आहेत. आणि येशूने भविष्यवाणी केली त्या गोष्टी अंतिम दिवसात पुन्हा तुमच्या डोक्यात येतील. आणि ह्या बाजूला असतील. देवाचे शिक्के, आणि पशूची छाप; दोन आत्मिक सामर्थ्य एकत्र कार्य करीत आहे.

135 आता, तुम्हाला माहीत आहे का की देवाचा शिक्का हा ज्येष्ठत्वाचा हक्क आहे, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा आहे. इफिसकरांस पत्र 4:30 म्हणते, “देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करु नका; खंडणी भरुन प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही त्या आत्म्याच्या योगे मुद्रीत झाले आहात.” जेव्हा ते नवीन जन्म पावले ते पवित्र आत्म्याने भरले गेले. पवित्र आत्मा हा नविन जन्म आहे. आपल्याला ते ठाऊक आहे. तुम्ही—तुम्ही आत्म्याने जन्म पावलेले आहात. मी त्याचा स्विकार करीन. परंतु तुम्ही जोपर्यंत जन्म पावलेले आहात!

136 तेथे एक बाळ आईच्या गर्भात असते. त्याच्यामध्ये एक प्रकारचे जीवन असते. ते जीवन असते आणि ते छोटेसे…त्या लहान पेशी त्याच्या शरीरामध्ये फिरत आणि लाथ मारीत आणि *त्या* प्रकारे उड्या मारीत असतात. परंतु जेव्हा ते जन्माला येते, त्याच्याकडे…[भाऊ ब्रॅन्हम त्याच्या हाताने एकदा टाळ्या वाजवतात, थाप मारण्याची नक्कल करतात.—सम्पा.] अशाप्रकारे, आणि मग ते किंचाळते, एक जीवंत जीव बनतो.

137 आणि एक लहान मुल मंडळीत जाऊ शकते आणि म्हणते, “होय, मी मंडळीमध्ये विश्वास ठेवतो. मी, मी जाईन, मी हे करीन. आणि मी एक चांगले…मी चांगले करु इच्छितो, मला चांगले करायचे आहे.” परंतु त्यासाठी कसली गरज आहे तर ती शुभवर्तमानाच्या थापेची त्याला जागे करण्यासाठी, सार्वजनिक जीवनासाठी किंचाळण्याची आणि पवित्र आत्मा त्यामध्ये आरोळी मारतो, ह्यापूर्वी जशी आरोळी मारली नव्हती. तेव्हा ते एक नवी उत्पत्ती होते, ते आत्म्याने जन्म पावते. मग वाढण्यास हालचाल करण्यास सुरुवात होते, आणि मग देवामध्ये त्याचे अस्तित्व तयार होते, पाहा, अगदी एका बाळासारखे, जन्माला येणाऱ्या बाळासारखे त्याचे अस्तित्व जगात असते.

138 मग जर हे पृथ्वीवरील गृहरुपी मंडप मोडले, आपल्याकडे एक आहे जे वाट पाहात आहे, पाहा. अगदी त्याचप्रमाणे जसे नैसर्गिक शरीर पुढे येते, तेथे एक आत्मिक शरीर त्याचा स्विकार करण्यासाठी असते जेव्हा ते आईच्या उदरातून टाकले जाते. आणि जेव्हा

ते आईकडून, पृथ्वीवरुन टाकले जाते, जे, जे तिच्या गर्भात असते, ते कण्हत, वेदना भोगित आहे, (हे परमेश्वरा!) कण्हत, वेदना भोगीत, वृध्द होत, आणि आजार, आणि सर्वकाही त्यात आहे आणि त्याच्या आतील आत्मा त्या नदीपलीकडे असलेल्या भूमीला शोधत आहे. तो कण्हत आहे, फिरत आहे, उड्या मारत आहे, (होय, महाशय) कारण तेथे एक जीवन आहे जे अनंतकालचे जीवन आहे. ते त्या शरीरात आहे. ज्याला मरावे लागणार आहे. आणि कधी, जसे आई नैसर्गिक शरीर टाकते आणि आत्मिक शरीर घेते; पृथ्वी टाकेल, नैसर्गिक शरीर टाकले जाईल आणि दैहिक शरीर...किंवा गौरवी शरीर ते पकडील पलिकडे. जर हे पृथ्वीवरील मंडपरुपी गृह मोडले जाईल, आपल्यासाठी एक वाट पाहात आहे. हेच कारण आहे तुम्ही जगाच्या गोष्टी विसरता. त्या तुमच्यासाठी, मृत आहे. तेथे आत्मा आहे.

आता लक्ष द्या. जेव्हा आम्ही आता पुढे जात आहोत. ते दोन आत्मे.

139 पवित्र आत्मा हा नविन जन्म आहे, आपल्याला ते ठाऊक आहे. ते देवाच्या आत्म्याने, पुन्हा जन्मणे आहे. तशाच प्रकारे तुमचा जन्म झाला आहे, आत्म्याद्वारे. आत्म्याद्वारे जन्म झाला आहे, तोच नविन जन्म आहे. ठीक आहे. तुम्ही आत्म्याद्वारे जन्म पावलेले आहात; तर मग जेव्हा तुम्ही आत्म्याने जन्म पावता, तुम्ही पवित्र आत्म्याने भरले जाता. ठीक आहे.

140 तर मग जेव्हा हे दोन पृथ्वीवर आहेत, दैहिक आणि आत्मिक, कधी...मी हे पाहिलेले आहे. आता संपवत असता, मी आता संपवू इच्छितो, काही मिनीटे हे सांगून. दैहिक किंवा आत्मिक, दौघांपैकी एक...आता माझी आशा आहे की प्रत्येकजण हे समजत आहे. आता तुम्ही जितके होईल तितके शांत आणि आदरणीय असा.

141 आता, तुम्ही हे कधी पाहिले आहे का? आज तुम्ही हे आपल्या मंडळीत पाहाता, अगदी समुहामध्ये जेथून आपण आपल्याला वेगळे केले आहे आणि संघटना केल्या आहेत; आणि आपण हे सर्व पाहिले आहे. आणि तुम्ही पाहिले एक मनुष्य एखादे वचन घेतो, आणि, भाऊ, तो मनुष्य ते वचन घेऊ शकतो आणि त्यास नव्याने जगू शकतो, असे जगतो जसे ते बायबलमध्ये अभिवचन दिले आहे आणि दुसरा मनुष्य त्याला ते करताना पाहतो, आणि तो तेथे येईल आणि ते करण्याचा प्रयत्न करील, आणि असफल होईल. मला आशा आहे की तुम्ही आता वाचत आहा. तो असफल होईल. का? त्या वचनाने त्याला प्रेरित केलेले नाही. तो फक्त त्याची नक्कल करण्याचा प्रयत्न करीत आहे. तो कोणासारखी नक्कल करण्याचा प्रयत्न करीत आहे. तो नव्हता...बरे, कदीचित तो मनुष्याने पाठवलेला असेल. कदाचित कोणी मनुष्य म्हणाला, “तुम्ही ती गोष्ट करु शकता.” जसे येशूने म्हटले ते अशाप्रकारे असेल. बायबल त्याची भविष्यवाणी करते अंतिम दिवसात, “जसे यान्नेस आणि याब्रेस ह्यांनी मोशेला अडवले.”

142 तेथे मोशे उभा होता आणि तेथे यांब्रेस उभा होता. आणि मोशेने त्याची काठी फेकली आणि तिचा एक साप झाला. “का?” फारोने म्हटले, “यांब्रेस येथे ये. तुलाही ती गोष्ट करता येईल.” आणि त्याने केले, पाहा. परंतु काय घडले? तेव्हा मोशेच्या काठीने त्याची काठी गिळून टाकली. पाहा, ते प्रगट केले गेले. त्याची काठी कोठे होती?

143 अगदी अतिसंवेदनशील समज. ही काही ह्या अध्यात्मवादासारखी आहे. हे त्या काही मंडळ्यांसारखे आहे जे देहावर विश्वास ठेवतात. तो मार्ग, त्या गोष्टी...ते म्हणतात, “का, ते तर दुसऱ्या दिवसासाठी होते.” ते पूर्णतः बाहेर आहेत. परंतु पाहा हा आत्मा अंतिम दिवसात खऱ्या आत्म्याची नक्कल करणार आहे. समजले? तेथेच जेथे तुमची समस्या

चालू होते. अगदी त्या खऱ्यासारख्या, पाहा. परंतु तो ते प्रगट करु शकत नाही, तो ते पकडू शकत नाही, तो ते टिकवू शकत नाही. अरे देवा!

144 लोक येतात, आणि म्हणतात, “माझ्याकडेही पवित्र आत्मा आहे.” पाहा ते कशाप्रकारे जगतात. ते एका संजीवनापासून दूसऱ्या संजीवनापर्यंत टिकत नाही, एका सभेपासून दुसऱ्या सभेपर्यंत टिकत नाही. ते प्रगट केले आहे, परंतु ते त्यांच्याकडे नाही. जर एक मनुष्य देवाच्या आत्म्याने जन्मला आहे, किंवा एक स्त्री, त्यांच्यामध्ये त्या आत्म्याची फळे आहेत. ते देवाला भिऊन चालतात. ते ते जीवन जगतात. समजले? ते स्वतःला जगाच्या गोष्टीपासून दूर ठेवतात. देव त्यांच्यामधून फिरतो आणि स्वतःला प्रगट करतो; आणि सिध्द करतो की देव त्यांच्यामध्ये कार्य करीत आहे. दूसरा त्याची नक्कल करतो. समजले?

145 नक्कल, हेच खाली फार काळापासून चालत आले आहे, नक्कल करीत आहे, इश्माएल आणि इसहाकाकडे पाहा; आणि ते सर्व, पाहा, नक्कल करीत आहेत. मोशे संदेष्टा, आणि बलाम संदेष्ट्याकडे पाहा. समजले? पाहा ते कसे करीत आले! यहुदाकडे पाहा, आणि येशूकडे पाहा.

146 आणि येशूने भविष्यवाणी केली की हा पवित्र आत्मा, अंतिम दिवसात, देवाचा शिक्का असेल. आता, पशूची छाप काय असेल? देवाचा शिक्का नाकारणे आहे का? कारण ज्या सर्वांकडे देवाचा शिक्का नाही त्यांच्याकडे पशूची छाप आहे. आणि जर ह्या दोन आत्मिक खूणा आहेत, त्यातील एक देवाचा खरा शिक्का आहे, दूसरा स्वमत त्याग आहे. तुम्ही ते पाहू शकता का?

147 जुन्या करारातील ह्या खुणेकडे पाहूया, तेव्हा तुतारी वाजवली जात असे, योबेल वर्ष, प्रत्येक काही वर्षानंतर, ते—ते गुलाम मुक्त केले जात कारण तुतारीचा नाद झाला. आता, प्रत्येकजण जे मुक्त होऊ इच्छित आहेत, ते जाऊ शकतात. परंतु, त्यांच्यातील काहीजण, ते गुलाम राहणे पसंत करतात, म्हणून ते त्यांना वेदीजवळ नेत. आणि चर्चच्या खांबावर, आणि अरीने त्यांचे कान टोचतात. आणि त्यांना कायमची ती खूण दिली जाते, ते त्या धन्याची सेवा सदैव करतात.

148 आणि आज तुम्ही सत्यावर आधारित शुभवर्तमानाचा संदेश ऐकाल, “आता जर तुमची इच्छा असेल तर तुम्ही मुक्त होऊ शकता,” परमेश्वर तुमच्यासाठी बोलत आहे, परंतु जेव्हा तुम्ही त्या सीमारेषेपर्यंत येथे येता आणि त्यावर पाहता, आणि सत्याचे ज्ञान घेतात, आणि मग त्यापासून वळता, तो तुमच्या कानामध्ये भोक पाडतो आणि तुम्ही नेहमी एक बौद्धीक विश्वासी होता. तुम्ही धार्मिक होता आणि मंडळीत जाता, परंतु पवित्र आत्मा कधीच मिळत नाही. पाहा, मग तुम्ही उरलेले तुमचे दिवस त्याची सेवा करता. आता पशूची छाप, किंवा देवाचा शिक्का. आणि आपण इतके जवळ आलो आहोत.

149 आता, पाहा, वचन प्रेरित झालेले पाहिजे; ते ऐकणे, ते ओळखणे, आणि त्यावर कृती करणे. कित्येक लोक ऐकतील, परंतु ते ओळखणार नाही.

देव म्हणेल, “हा तुझ्यासाठी समय आहे.”

150 “मला देवविषयक वेडा व्हायचे नाही. मला—मला त्यासारखे व्हावयाचे नाही.” पाहा, ते ओळखत नाही.

151 आम्ही सभांना जाऊ, महान पवित्र आत्मा खाली येईल. मी त्या दिवशी तेथे बसलो होतो, जेव्हा एक दृष्टांत माझ्यापुढे आला आणि तीच भविष्यवाणी केली. मी म्हणालो,

“येथे एक तरुण पुरुष आला.” “येथे ये,” त्या सेवकाला म्हणाला, “तुला हृदयाचे दुखणे आहे आणि तू शोधत आहेस...”

“होय. ते अगदी बरोबर आहे.”

152 “पाहा, ती स्त्री तेथे येत आहे?” “येथे ये. तुझ्या स्तनावर गाठ आहे, आणि ती डाव्या स्तनावर आहे, आणि तु अगदी वाईट स्थितीत आहे. आणि तू एक पापी आहे आणि करु नको...”

“अगदी बरोबर.”

153 ते पुरुष येथे सभोवती पाहत बसले होते, प्रचारक आणि सर्व, म्हणाले, “हो!” चला सभेला जाऊ, पवित्र आत्म्याला सभेमधून जाताना पाहू आणि हृदयातील गुप्त गोष्टी सांगू, तशा गोष्टी. म्हणाला, “अद्भूत! मला वाटते. होय.” पाहिले? हो भावा! समजले? ते—ते—ते दुसऱ्या बाजूला आहे. तेथे काहीतरी घडले. स्त्रीया तसेच करीत राहतील, त्याच गोष्टी करीत राहतील. पुरुष मागे जातील. जसे एक डुक्कर चिखलाकडे लोळण्यासाठी आणि एक कुत्रा त्याच्या ओकीकडे परततो, तसेच. तुम्हाला समजत नाही का? आता मी बोलत आहे...

154 पाहा, मित्रा, तर मग तुम्हाला कळले पाहिजे, तुम्ही कोणत्या स्थितीत आहात. हेच कारण आहे की ह्या टेप, मी म्हणालो, “फक्त मंडळीसाठी.” समजले? “फक्त मंडळी.” जर तुम्ही प्रकाशातून...अंधारातून प्रकाशाकडे बोलावलेले आहात, मृत्यूतून जीवनाकडे; औपचारिक आणि ख्रिस्ताच्या बौध्दिक संकल्पनेकडून, एका नविन जन्माच्या अनुभवाकडे; आणि तुमचे जीवन पारखत, की जगाच्या गोष्टी वेगळ्या कराव्या; आणि तुम्ही ख्रिस्तासाठी उभे राहावे, पर्वा न करता; तेव्हा काहीतरी घडते. समजले? तेथे तुमच्यामध्ये काहीतरी आहे, भुकेलेले आणि हालचाल करणारे, जसे ते याकोबामध्ये होते. समजले, तुम्ही देवाबरोबर झोंबी करता, त्यानंतर तुमची चाल बदलते. तुमच्यामध्ये काहीतरी वेगळे आहे, तुमचे परिवर्तन झाले आहे.

155 आता, त्याच्याकडे आहे, ते करण्याआधी ते तुम्हाला प्रेरित करते. मी पर्वा करीत नाही, मी येथे उभा राहू शकतो आणि प्रचार करु शकतो जोपर्यंत...माझे किती केस पडायचे आहेत, माझे खांदे वाकेपर्यंत आणि मी नव्वद वर्षाचा होईपर्यंत, तुम्ही रोज ऐकता; जोपर्यंत देव तुमच्यामध्ये प्रज्वलित करित नाही, तुम्ही त्याच रुपात आहात.

156 दोन दिवसांपासून मी ह्यावर अभ्यास आणि प्रार्थना करीत आहे, समजले? मी म्हणालो, “प्रभू, मी हे मंडळीला सांगू का?”

157 कोणीतरी बोलले, “सांग. समय जवळ आला आहे. ते सांग.” मला वाटते तो मला लवकरच ओढून घेणार आहे, म्हणून मी—मी ते तुम्हाला कळवू इच्छितो.

158 “माझ्याकडे कोणीही मनुष्य येऊ शकत नाही,” येशूने म्हटले, “प्रथम पित्याने आकर्षिल्याशिवाय. होय, मला ठाऊक आहे तुम्ही म्हणाल, तुमच्याकडे परमेश्वर आणि अब्राहाम आहे, तुमचा पिता; परंतु मी तुम्हास हे सांगतो, तुम्ही...तुमचा पिता सैतान.” येशूने म्हटले, धार्मिक पुरुष, याजक, आणि थोर पुरुष, “तुम्ही, तुमचा पिता सैतानापासून आहात.” समजले? आत्म्याच्या फळाकडे, पाहा.

159 आता, पाहा, ते तुमच्यामध्ये प्रज्वलित झाले पाहिजे.

160 मी नोहाला असे सांगताना कल्पना करु शकत नाही, “तुम्हाला ठाऊक आहे काय? तेथे कोणे एके दिवशी कदाचित पाऊस पडेल, म्हणून मी बाहेर जातो आणि माझ्यासाठी एक तारु बांधतो. जर पाऊस पडला, तर मी तारुमध्ये जाईन आणि त्याजपुढे जाईन.

आणि मला कसलाही त्रास होणार नाही, कारण मी तारुमध्ये जाणार आणि पुढे जाईन." तुम्ही कल्पना करु शकता? नाही. नाही. ते तसे नव्हते. जर ते तसे असते...हो, निवडलेले हे आता ऐको. जर ते तसे असते, जेव्हा पहिला थट्टा करणारा तेथे आला, जसे बायबल म्हणते तेथे होते, त्याची थट्टा केली, त्याने त्याची हाथोडी खाली ठेवली असती आणि निघून गेला असता.

161 जसे आज मनुष्य करतात, त्याची सुरुवात येशू बरोबर होते; आणि जेव्हा ते त्याच्यावर पाहात आणि सत्य पाहात, ते त्याला पाठ फिरवीत. ते त्यापुढे उभे राहु शकत नव्हते.

162 जसे एक सुप्रसिध्द सुवार्तिकाने म्हटले, "ते—ते माझी सेवकाई नष्ट करुन टाकील." मी त्या सेवकाईची पर्वा करीत नाही जी पवित्र आत्मा नष्ट करील. ती नष्ट झालीच पाहीजे. आता, परंतु, पाहा, तो अहंकार आहे, इतका मनुष्य, इतका व्यक्ती. आता ह्यामध्ये पाहूया.

163 नोहा बाहेर होता, आणि त्याने ऐकले, आणि त्याने ओळखले, आणि त्याने कृती केली. कितीही थट्टा करणारे का येईना, त्याने तारु बांधले.

"नोहा, तू देवविषयक गोष्टीत वेडा आहेस."

164 "मला काहीच फरक पडत नाही." बांधत राहीला! त्याने ऐकले होते. त्याने त्याला देव म्हणून ओळखले होते, त्याने त्याची शास्त्रलेखाद्वारे पारख केली, आणि ते तसे होते. त्याने पर्वा न करता, तारु बांधले.

165 काय तुम्ही कल्पना करु शकता, काय तुम्ही ह्याची कल्पना करु शकता की मोशे, त्याच्या मिसराच्या मार्गावर, एके दिवशी निघाला आणि त्याची पत्नी, सिप्पोरा हिस म्हणाला, "सिप्पोरा, तुला माहीत आहे की? मी काही माझे व्याकरण नीट केले आहे. मी माझे गणित थोडे व्यवस्थित केले आहे, माझे भूमिती आणि, माझ्या इतर गोष्टी, आणि माझे शिक्षण. कारण मी इतक्या काळापासून बकऱ्या चारत आहे, मी—मी—मी—मी त्यांतील काही गोष्टींचा सराव केला आहे. मी मिसरात एक चुक केली. मला वाटते मी तेथे जाईन आणि ती सुधारीन. मला वाटते मी खाली जावे"? नाही, पहिली लाट त्याच्या विरुध्द आली, तो तेथेच पडला असता,

166 त्याने काय केले? तो ते सर्व विसरला ते काही त्याला भूमिती आणि त्याच्या सर्व बौध्दिक गोष्टी. त्यामुळेच तो समस्येत पडला होता.

167 तेच आहे ज्यामुळे मंडळी आज समस्येत आहे. तेथे खूप शिक्षित प्रचारक आहेत. ज्यांचा जन्म आत्म्याने झाला नाही. पुरुष आणि स्त्रीयांना सामर्थ्य आणि येशू ख्रिस्ताचे पुनरुत्थान ह्या विषयीच्या प्रचाराऐवजी, बौध्दीक भाषणे ऐकण्यास आवडतात. तेच आहे ज्यामुळे आपण आज समस्येत आहोत. आम्हाला आता शाळा आणि शिक्षणाची प्रचारकांना गरज नाही. आपल्याला देवाने बोलावलेल्या पुरुषांची जे पवित्र आत्म्याने भरलेले आहे त्यांची गरज आहे, आणि मनुष्याने बनवलेल्या कोणा संप्रदायाच्या दैवीज्ञानाची गरज नाही. आपल्याला देवाने बोलावलेले मनुष्य हवेत.

168 मोशे बकऱ्या चारीत होता. स्थिर स्थावर झाला होता आणि विसरला होता. त्याला कळले की त्याची बुध्दी असफल झाली होती. त्याला कळले होते की त्याच्या शिक्षणाने त्याला असफल केले होते. तो शेरडेमेंढरे चारीत होता. परंतु त्याने ऐकले, हो, "मोशे, तू आपल्या पायांतले जोडे काढ, कारण ज्या जागी तू उभा आहेस ती भूमी पवित्र आहे." त्याने ते ऐकले. ते काय होते? देवदूताची वाणी त्याच्याशी शास्त्रलेखाप्रमाणे बोलली होती.

त्याने अब्राहाम, त्याचा पिता, ह्यास अभिवचन दिले होते, “मी माझ्या लोकांची भेट घेईन ते चारशे वर्षे येथे राहतील, आणि मी माझ्या सामर्थी हाताने त्यांना बाहेर काढीन.” त्याने ओळखले की ते देवाचे अभिवचन पूर्ण होत होते.

169 मला येथे एक मिनीट थांबू द्या. हे तुम्हाला समजू दे. काय तुम्ही समजत आहात की आज मी तुमच्याशी काय बोलत आहे? देवाचे वचन तुमच्यापुढे प्रगट केले जात आहे, आणि तुम्हाला ते समजत नाही. सदोम आणि गमोराची आठवण करा; अंतिम दिवसासाठी ख्रिस्ताचे अभिवचन आठवा.

170 मोशेने ते ओळखले; तो शास्त्रलेख होता, ते एक अभिवचन होते. त्याने ऐकले, त्याने ओळखले. त्याच्यामध्ये कोणी आला, भावा, तो जाऊ शकतो तर मग ते कर. त्याने ते केले. तो खाली जाऊ शकला असता आणि प्रत्येक फारोला थांबवू शकला असता. त्याच्या इच्छेप्रमाणे तो कोणतीही पीडा बोलवू शकला असता. तो तांबडा समुद्र उघडू शकला असता, कारण त्याने ऐकले होते, त्याने ओळखले होते. तो देवाच्यावतीने कृती करीत होता.

“मी तुझा देव होईन, तू माझा संदेष्टा होशील,” त्याने म्हटले.

आणि त्याने म्हटले, “मी ते करु शकत नाही.”

171 त्याने म्हटले, “बरे, तर तू देव हो, आणि अहरोन तुझा संदेष्टा होईल. तुला गेलेच पाहीजे, कसेही करुन.”

172 तो कधीच बोलला नाही, “बरे मला खाली जावे लागेल आणि सर्व गोष्टी नीट कराव्या लागतील.”

173 काय तुम्ही एलीयाला कार्मेल डोंगरावर पाहू शकता, म्हणाला, “तुला ठाऊक आहे, ही भूमी भीषण पापी आहे, कदाचित, मला तेथे जावे लागेल आणि अहाबाला सांगावे लागेल. त्याला त्याची लाज वाटायला पाहीजे. कदाचित मला तेथे डोंगरावर जावे लागले. आणि बसावे लागेल, आणि उपवास करावा लागेल, जोपर्यंत ते लोक कंटाळतील आणि मला तेथे मरेपर्यंत उपाशी पाहून थकतील”? नाही. नाही. ते तसे नव्हते.

174 परंतु त्याने ऐकले, आणि त्याने ओळखले, आणि त्याने कृती केली. “मी कावळ्यांस आज्ञा केली आहे ते तुला अन्न पुरवतील. करीथ ओहोळानजीक राहा.”

175 जेव्हा बाल आणि परमेश्वर ह्यांच्या मध्ये निर्णयाची वेळ आली, त्याने म्हटले, “जा, तुमची अर्पणे आणा, तुम्हाला जे करायचे आहे ते करा, आणि तुमच्या देवांना बोलवा.” जेव्हा त्यांनी स्वतःला घाव केले, आणि खूप मांस आणले, आणि नाचू बागडू लागले, मोठमोठ्याने हाका मारु लागले, त्याने म्हटले, “मोठ्याने पुकारा, देवच तो, तो विचारांत गढून गेला असेल, तो एकांतात गेला असेल, प्रवासांत असेल, कदाचित तो निजला असेल.” ओह, भाऊ!

176 “तुम्हाला हे ठाऊक आहे?” त्याने म्हटले, “मी यहोवाचा विश्वासी आहे. म्हणून मी हे कसेही करु शकतो.” होय, नाही. तुम्ही त्याची नक्कल करु नका. नाही. तुम्ही कधीही एलीया होण्याचा प्रयत्न करु नका जोपर्यंत देव तुम्हाला त्यासाठी बोलावीत नाही. होय, महाशय. “मी यहोवा देवाचा सेवक आहे.” तेथे त्यांचे सातशे होते, परंतु त्यांच्यातील कोणीही ते करण्याचे धाडस केले नाही.

177 मग जेव्हा त्याने गोऱ्हा कापला आणि त्यावर पाणी ओतले, त्याने म्हटले, “परमेश्वरा, मी ह्या सर्व गोष्टी तुझ्या आज्ञेने केल्या आहेत.” पाहा…दूसऱ्या कोणी हा प्रयत्न केला असता, तर तो पूर्णतः असफल ठरला असता.

178 तुम्हाला प्रेरणा मिळाली पाहीजे! पवित्र आत्मा ह्या गोष्टी आणतो आणि तुम्हाला प्रगट करतो.

179 हीच आज गोष्ट आहे. तुम्ही वेदीपुढे जाऊ शकत नाही आणि म्हणत नाही, "हालेलुयाह, हालेलुयाह प्रभू, मला पवित्र आत्मा पाहिजे. हालेलुयाह, हालेलुयाह." नाही.

180 परंतु, बंधु, भगिनी जेव्हा पवित्र आत्म्याने ते वचन तुम्हाला प्रेरित केले, तुम्हाला ते तुम्ही तुमची जागा सोडण्याअगोदर मिळते. तुमच्यामध्ये काहीतरी जळते. प्रचारकाला तुम्हाला सांगण्याची गरज नाही की *हे* कर आणि *ते* कर. जुनी पाने गळून पडतील, आणि नविन पाने येतील. ते तुला प्रेरित झाले आहे. तुम्ही त्या प्रचारकावर रागवत नाही जेव्हा तो बायबलमधून तुम्हाला सत्याचा प्रचार करतो. तुम्हाला ते आवडेल, तेथे पोहचाल. ते तुमच्या जीवासाठी अन्न आहे.

181 येशूने, त्याच्याविषयी, म्हटले, "मला जे करावेसे वाटते ते मी करीत नाही, माझ्यामध्ये. पुत्र स्वतः काही करु शकत नाही जोपर्यंत तो ते पित्याला करताना पाहात नाही." ती वचने...तो स्वतः इम्मानुएल होता. तो येथे पृथ्वीवरील देव होता. तो एक देह होता ज्यात देव रहात होता. तो, तो तंबू होता ज्यात परमेश्‍वर रहात होता. आमेन. परंतु त्या सर्वात, कुमारीपासून जन्मलेला देवाचा पुत्र होता, इम्मानुएल त्या आत्म्याच्या पुर्णतेमध्ये त्याच्याकडे अमाप आत्मा होता. आणि तरीही त्याच्या स्वतःच्या शरीरात, तो म्हणतो, "मी काहीही करीत नाही. जोपर्यंत पिता ते मला दाखवत नाही." त्याला ते करण्यासाठी प्रेरित करतो.

182 सैतान म्हणाला, "ह्या धोंड्याच्या भाकरी कर, आणि एक चमत्कार कर. मला पाहू दे तुला करताना."

183 त्याने म्हटले, "असा शास्त्रलेख आहे, 'मनुष्य केवळ भाकरीने जगणार नाही.'" माझ्या देवा! परंतु जेव्हा लोक भुकेले होत, त्याने पाच भाकऱ्या आणि दोन लहान मासे घेतले, आणि पाच हजारांना खाऊ घातले. होय, हालेलुयाह! तुम्ही समजत आहात मला काय म्हणायचे आहे?

184 तुम्ही नक्कल करण्याचा प्रयत्न करु नका. पेंटेकॉस्ट लोकांबरोबर तीच समस्या आहे. आज मंडळीबरोबर ही तीच समस्या आहे, तेथे कित्येक जण आहे जे पवित्र आत्मा असल्याची नक्कल करतात. तेथे कित्येक जण आहेत जे दैवी आरोग्य मिळाल्याची नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. तेथे पुष्कळ जण आहेत जे प्रभूच्या वेगवेगळ्या गोष्टींची नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. तुम्ही तसे करु शकत नाही. त्या गोष्टी निवडीद्वारे, देवाच्या पाचारणाद्वारे येतात; तुम्हाला मातेच्या उदरांतून त्यासह पाठवलेले आहे. "दाने आणि वरदाने पश्चातापाविना मिळतात." अरे, माझ्या देवा! ते खरे आहे. तुम्ही तुम्हाला ते बनवू शकत नाही जे तुम्ही नाही.

185 परंतु जर देवाने तुम्हाला बोलावले आहे, तर ह्या जगातील सर्वात धन्यवादीत मनुष्य आहात कारण त्याने तुम्हाला बोलावले आहे. मग ते तुमच्यासाठी वास्तव बनते.

186 जर माझ्याकडे वेळ असता, तर मी त्या खारीबद्दल बोललो असतो, जी त्यादिवशी माझ्याकडे वळली. मी असे ह्यापूर्वी कधीच पाहिले नाही, आणि मी ते करु शकलो नसतो. हेट्टी तेथे माझ्याकडे पहात बसला होता. ते कसे काय घडू शकते? तो ते करु शकला नसता, परंतु तो प्रेरित झाला होता, प्रज्वलीत झाला होता. शब्द बोलला गेला आणि ते तसे केले गेले. हालेलुयाह!

187 पौल, काय तुम्ही त्याला बोलताना कल्पना करु शकता, “मी ह्या समुद्रावर चौदा दिवस आणि रात्री होतो, आणि तारे नव्हते, चंद्र, किंवा सूर्य किंवा काहीच नव्हते. मी वर जाईन आणि त्यांना सांगेन, ‘हिम्मत धरा, कारण परमेश्वर कसेही करुन आमची काळजी घेईल’”? होय, देव तशाप्रकारे कार्य करीत नाही. देव तसे करीत नाही.

188 तुझा विश्वास योग्य आहे, भावा. तुझा विश्वास आहे. परंतु जोपर्यंत ती गोष्ट तुला प्रेरित करते!

189 ओह, येथे एक लाल दिवा तेथे टांगलेला आहे, आणि जर मी पाहतो...मी म्हणतो, “मी माझा पाय प्रवेगक वर ठेवतो. माझ्याकडे एक गाडी आहे. मी त्या प्रकाशापलिकडे, एकशे वीस मैल ताशी जाऊ शकतो.” ते खरे आहे. “माझ्या पायाखाली असलेली शक्ती मी अनुभवू शकतो.” परंतु तू थांबणे पसंत करतो. जोपर्यंत “जा” असे चिन्ह दिसत नाही. हालेलुयाह!

190 तुम्हाला समजत आहे माझा काय अर्थ आहे? [मंडळी उत्तर देते, “आमेन.”—सम्पा] जेव्हा ते “जा” असे चिन्ह येते, मग ठिक आहे. जेव्हा एखादी गोष्ट तुम्हाला प्रेरित करते, आणि देव त्याची ओळख देतो जशी त्याने पूर्वी केले होते, ठीक आहे. परंतु जोपर्यंत तो ते करतो, आपल्याकडे असा समुदाय आहे जो यहुदा सारखा नक्कल करणारा, बरोबर चालणारा, म्हणणारा, “मी त्यांच्यासारखाच आहे. मी सुध्दा, एक ख्रिस्ती आहे.”

191 ओह, तुम्हाला आठवते का? स्किवाचे पुत्र—स्किवा, बाहेर गेले आणि म्हणाले, “आम्ही तुम्हास शपथ घालतो, तुम्हास शपथ घालतो येशूच्या नावाने ज्याची पौल घोषणा करतो. बाहेर या!”

त्याने म्हटले, “पौलाला मी ओळखतो व येशूला मी ओळखतो, पण तुम्ही कोण आहा?”

192 तो समय येत आहे जेव्हा खरे आणि खोटे प्रगट केले जाईल. ते ख्रिस्ती लोकांत आज दाखवले आहे. ते आज मंडळीत दाखवले आहे. ते आज लोकांमध्ये दाखवले जात आहे. मी तुम्हाला फार वेळापासून थांबवले आहे; माझी इच्छा आहे की तुम्हाला हे समजावे.

193 पौलाने कधीच म्हटले नाही, “मी विश्वास करतो, ‘मी वर जाईन आणि म्हणेन, हिम्मत धरा.’” नाही.

194 त्याने काय केले? त्याने एका देवदूताचे ऐकले. त्याला ठाऊक होते की हा तोच दूत आहे जो त्याच्याशी सदैव बोलला आहे. त्याने ओळखले आणि त्याने कृती केली. वर गेला आणि म्हणाला, “धैय धरा. कारण देवाचा दूत ज्याचा मी सेवक आहे, गेल्या रात्री. माझ्याजवळ उभा राहून म्हणाला, ह्या तारवांतील, तुम्हापैकी कोणाच्याही जीवाचा नाश होणार नाही. धैर्य धरा. जा तुमचे अन्न सेवन करा. सर्वकाही व्यवस्थित आहे.” आमेन. जेव्हा ते तुम्हाला प्रेरित होते. जेव्हा देव ते व्यवस्थित करतो!

195 मी येथे कुठेतरी एक शेरा केलेला आहे, मी लिहीलेला आहे. येथे तो आहे, हा... आपण सर्व गोष्टींच्या शेवटास आलो आहोत. संपविताना, मला हे अशाप्रकारे मांडू दे. मी आशा करतो की देवाने तुम्हाला काही गोष्टी प्रगट केल्या आहेत. पाहा. सर्व गोष्टीचा शेवट आला आहे. कोणीतरी त्या रात्री विचारले, मला वाटते ते भाऊ फ्रेड सॉथमन होते, आम्हाला विचारण्यात आले की अंतिम समय किती जवळ आहे.

196 भाऊ देमस शेकेरियन ने तो दृष्टांत पाहिला होता जो प्रगट झाला, आणि पाच दिवसानंतर, तसाच, घडला, त्याने त्याच्या बुटांमधून त्याला बाहेर टाकले. त्याने मला फोन केला. तो म्हणाला, “जोसेफ कसा आहे?”

मी म्हटले, “व्यवस्थित आहे.”

म्हटले, “तो दृष्टांत पाहतो का?”

197 मी म्हटले, “होय, त्याने मला डेविडविषयी, भाऊ वुडच्या मुलाविषयी सांगितले, जेथे तो मोटरसायकल वरुन पडला होता, ते घडण्याच्या तीन–चार दिवस अगोदर सांगितले होते, अगदी तंतोतंत.”

त्याने म्हटले, “तुम्हाला ठाऊक आहे, ह्या गोष्टी कुटूंबात घडतात.”

198 मी म्हटले, “नीतीच्या किंवा वाईट, दोघांपैकी एक त्या कुटूंबात असतात.”

199 आणि आम्ही त्या विषयी बोलत होतो, आणि ते, फ्रेड माझ्याशी बोलला, “भाऊ ब्रॅन्हम हे कोठून आले?”

200 मी म्हणालो, “पाहा, फ्रेड, आपण हे निसर्गाद्वारे समजूया. देव त्याच्या सृष्टीत कार्य करतो. पाहा, लक्ष द्या काय घडते. सूर्य पूर्वेला उगवतो. सगळ्यात प्राचीन संस्कृती आपल्याकडे आहे, ती चीन आहे.” आपण सर्व ते जाणतो.

201 सर्वात प्राचीन संस्कृती चीन आहे. ठीक आहे. संस्कृती पश्चिमेकडे जात आहे. आणि आता जर तुम्ही पश्चिम किनारा सोडला तर तुम्ही कोठे जाल. सरळ पलिकडे? चीन कडे जाता. अगदी बरोबर. आपण अंतिम समयात आहोत. बायबल सांगते, संदेष्टा म्हणतो, “तेथे एक दिवस येईल ती रात्र किंवा दिवस असणार नाही, जेव्हा सूर्य असणार नाही, परंतु संध्याकाळच्यावेळी,” तो अगदी संपण्याच्याअगोदर “पुन्हा तेथे प्रकाश असेल, तसाच.” येशूने म्हटले, “तेथे आगोटीचा पाऊस आणि वळवाचा पाऊस असेल. आणि आगोटीचा पाऊस दोन्ही आगोटीचा आणि वळवाचा पाऊस, त्याच मोसमात निर्माण करील.” आपण अंतिम समयात आहोत.

202 येथे पाहा, तुम्हाला मला दाखवू द्या. राजकरण संपुष्टात आले आहे. तुम्ही त्यावर विश्वास ठेवता? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.] आज मला काही दाखवा…

हे राष्ट्र जगातील सर्वात वाईट आहे, भ्रष्टाचारासाठी, अपवित्रतेसाठी. त्या रात्रीचे कुरियर जर्नल वर्तमान पत्र कोणी वाचले, लुईस्वीले येथे, जेव्हा त्या सर्व स्त्रीया, प्रत्येक राष्ट्रांतून, निवडलेल्या, देशातील सर्वात सुंदर स्त्री, आणि त्यांना ‘मीस युनिवर्स’ म्हणून उभी करतात? सगळ्यांनी केले परंतु रशिया. आणि त्यांनी खृशचेव्ह कडे पाठवले आणि त्याला विचारले, “का नाही?” त्याने म्हटले, “रशिया त्यांच्या स्त्रीयांचे कपडे काढीत नाही, की त्यांनी पुरुषांपुढे चालावे.” एक असंस्कृत, नास्तिक, अपवित्र राष्ट्र आपल्याला दुषण देत आहे. जे आपण स्वतःला ख्रिस्ती म्हणवतो, म्हणते, “रशिया त्यांच्या स्त्रीयांचे कपडे उतरवून, त्यांना असे चालण्यास लावत नाही. आणि तुम्ही रशियामध्ये कधीच तोकड्या विजार किंवा असे कपडे पाहत नाहीत.” ते अपवित्र आहेत. आणि आपण जे स्वत:ला “ख्रिस्ती” म्हणवतो!

203 ह्यांत आश्चर्य नाही, बायबल म्हणते, “सर्व मेजे वांतीच्या घाणीने भरली आहे. आणि मी कोणाला ज्ञान शिकवू शकतो, आणि थानतुट्या बालकास काय? कारण नियमावर नियम, कानूवर कानू; तोतऱ्यांच्या परभाषेत तो या लोकांशी बोलेल. ही विश्रांती आहे. तरी ते ऐकेनात.” आपल्याकडे आपल्या स्वतःच्या बौध्दीक संकल्पना आहेत. ओह, हे किती चांगले आहे की सारा दिवस त्यावर टेकून राहणे.

204 राजकारण, भ्रष्ट झाले आहे! लोकशाही, प्रजासत्ताक, आणि सर्व, खाली पडले आहेत. ते काय आहे? हा अप्रामाणिकांचा समुह आहे. प्रत्येक मनुष्य त्यावर काम करीत आहे, जो नविन जन्म पावलेला नाही, जो सैतानाचा आहे. सैतान म्हणाला, “जगातील प्रत्येक राज्य माझे आहे,” आणि येशूने कधीच त्याच्याशी वादविवाद केला नाही. हे जग सैतानाद्वारे नियंत्रित केले जात आहे. आणि प्रत्येक मनुष्य जो त्या सरकारकरिता काम करीत आहे, जर तो एक ख्रिस्ती नसला, तर तो त्या सैतानाचा आहे आणि सैतानाकरिता काम करीत आहे. ही राष्ट्रे येशू ख्रिस्ताच्या पायावर पडतील जेव्हा तो येईल, तेथे एक हजार वर्षाचे राज्य असेल.

205 आज येथे पाहा, ते आज काय करीत आहे. माझ्याकडे पाहात आहेत की मी काही पैसे ख्रिस्ती लोकांकरिता द्यावे, आणि मला वीस वर्षे राज्य जेलमध्ये पाठवू इच्छितात, धार्मिक हालचाली चालविण्यासाठी पैसे दिल्याबद्दल. आणि मद्य, आणि दारु, आणि धूम्रपान ह्यावर लाखो डॉलर्स वर्षाला खर्च केले जातात, की देशाला भ्रष्ट करावे. आणि मी जो नीतीमत्वाचा प्रचार करण्याचा प्रयत्न करीत आहे, येशू ख्रिस्ताच्या दरवाजामध्ये उभा राहून, आणि मला त्यासाठी तुरुंगात पाठवतात. आणि तशाप्रकारच्या गोष्टी ज्या वाईट आहेत, हीन, चलाख, ज्ञानाच्या आणि त्या दुरदर्शनाच्या कार्यक्रमांसाठी अनुमती देतात जे जगाला भ्रष्ट करित आहेत, स्त्रियांना कुत्र्यांकडे पाठवतात. आतापर्यंत मिळालेले सर्वात मोठे शाप; आणि त्यांना ते मिळत आहे. ते मला तुरुंगात शुभवर्तमान प्रचार करण्यासाठी पाठवतात; काही डॉलर्स घेऊन– शुभवर्तमान प्रचार करण्यासाठी, ते लोक मला शुभवर्तमान प्रचार करण्यासाठी देतात. मी श्रीमंत नाही आणि मी ते करु शकत नाही, परंतु तरीही त्यांनची इच्छा आहे की मला तुरुंगात पाठवावे. मला दोन वर्षे ठेवावे, आणि परीक्षेतून जावे. होय, किती खालची पातळी, किती ओंगळ! देवा दया कर!

206 मी गोष्ट सांगेन, कदाचित हा देवाचा मार्ग असेल तो अणू बॉम्ब पाठवण्याआधी. तुम्हाला काहीतरी चुकीचे करावे लागेल, तुम्हाला माहीत आहे. तुम्हाला त्याच अभिषिक्ताला स्पर्श करावा लागेल, त्या शास्त्रलेखाप्रमाणे…“माझ्या अभिषिक्ताला शिवू नको.” ते बरोबर आहे. म्हणून, जर न्याय आणण्याकरिता ते तसे घ्यावे लागते, जसे दानिएलाच्या दिवसात किंवा कोठेतरी ते घडले, तसे येऊ द्या. मी तुझा सेवक आहे, प्रभू. ते बरोबर आहे. होय.

207 राजकारण, खालच्या दर्जाला गेले आहे! राष्ट्र भ्रष्ट झाले आहे! ठीक आहे, पाहा! ते सैन्यांना तोकड्या विजार घालणार आहे. अरे देवा! राजकारण, युध्द! राजकारण संपुष्टात आले आहे. हुकूमशहा चुकीचे आहेत. राजकारण चुकीचे आहे. ते त्या दैवी राजाबरोबर का राहिले नाही जो त्यांना देवाने दिला होता, दाविद? इंग्लंडच्या राजाने म्हटले, “जेव्हा ह्या—जेव्हा ह्या लोकशाहीची स्थापना झाली,” म्हणाला, “आता हे ठीक आहे, परंतु अशी वेळ येईल,” त्याने म्हटले, “ती काहीच नसणार. तेथे सर्व जहाजे असतील आणि नांगर नसणार.” आणि त्याचे बरोबर आहे. म्हणाला, “राजकरणी साबणाच्या पेट्यांवर प्रत्येक कोपऱ्यावर उभे आहेत, सर्व प्रकारच्या कुटील गोष्टी ज्या सरकारला भ्रष्ट बनवतात.” आणि तो मनुष्य खरा होता. अगदी तसेच घडत आहे.

208 एक मनुष्य तेथे जाऊ शकतो, आणि आत जातो. आणि पिऊन झिंगतो, आणि त्याला हवे ते फाडून टाकतो; आणि तेथे खाली जातो, तो सर्वांना ओळखतो, तेथे त्याला कोणी काही बोलत नाही. एक गरीब मनुष्य किंवा असा कोणी ज्याला कोणीच ओळखत नाही. तसे करण्याचा प्रयत्न करु दे, आणि त्यांना तुरुंगात पाठवले जाते. भ्रष्टाचार, अश्लिलता, हीनता, त्यांच्यातील चाळीस टक्के समलींगी आहेत. त्याविषयी विचार करा, पुन्हा सदोम आणि गमोरा! तो असा समुह आहे, धार्मिक समजणारा.

209 मी—मी आश्चर्य करतो की पुढे काय होईल, जेव्हा पुढचा अध्यक्ष येईल? देवाने आपल्याला एक चांगला देवभिरु मनुष्य दिला आहे, व्हाईट आईसनहॉवर. आणि आता मी...पाहा पुढची गोष्ट काय होते आणि आपल्याला कदाचित पुढच्या वेळी उंदिर मिळेल, निश्चित परंतु तेथे एक येत आहे, “एक फारो जो योसेफाला ओळखत नाही.” ते लक्षात ठेवा. मी त्याकडे एका सेकंदात येत आहे. राजकारण भ्रष्ट झाले आहे. आपल्याला ते ठाऊक आहे.

210 युध्द संपायला आले आहे. होय, त्यांनी एकदा दगड एकमेकांवर फेकले, एकमेकांना डोक्यावर दगडाने मारले, त्यांनी धनुष्य आणि बाण बंदुकीतून सोडले. मग त्यांच्याकडे रायफली होत्या. नंतर मशीनगन, नंतर एटीएट्स जर्मनीमध्ये, आणि अशा मोठ्या बंदूकी आपल्याकडे आहेत. नंतर त्यांनी हात बॉम्ब आणि विषारी वायू सोडले. परंतु आता त्यांच्याकडे हायड्रोजन बॉम्ब आहेत. युध्द अंतिम स्थितीत आहे. प्रत्येक राष्ट्राकडे ते आहेत, तर तुम्ही आता काय करणार आहेत? अगदी एक लहान राष्ट्र देखिल आज बंदुकीचा चाप वाकविल. तेच सर्व त्यांना करायचे आहे. आणि ते सर्व वर जातील. युध्द अंतिम स्थितीत आहे. होय! आमेन. युध्द अंतिम स्थितीत आहे. राजकारण अंतिम स्थितीत आहे.

211 शिक्षण अंतिम स्थितीत आहे. तरुण गुन्हेगारी अंतिम स्थितीत आहे. मुलांनो तेथे मुलांसाठी काही आशा नाही. ते वेडे झाले आहेत. तुम्हाला शिक्षण मिळू शकत नाही. तुम्ही शाळेत जाऊ शकत नाही आणि मुलांना शिक्षण देऊ शकत नाही. तो—तो दुहेरी नरकाचा मुलगा असणार जेव्हा तो शाळेत गेला होता ह्यापेक्षा. शिक्षक त्याला त्याविषयी काही सांगू द्या, तो मारला जाईल. ते एक लहान समुह करतील. आणि बाहेर तेथे जातील आणि त्या शिक्षकाला बंदुकीने मारतील, त्याला बाहेर काढतील आणि दोरीने त्याला वर बांधतील. आम्ही असे दोन हजार शिक्षक गमावले. एक मिनीट थांबा, मला वाटते वीस हजार शिक्षक, ह्याच्या मागच्या वर्षी. मी त्यांना दोष देत नाही. मला ते करायची इच्छा नाही, दोहोंपैकी एक. आता प्रत्येकवेळी त्यांच्याकडे चिन्ह होती. “ह्या मुलांना महाविद्यालयीन शिक्षण द्या.” त्यांना त्याची गरज आहे. परंतु ते सैतानाच्या हातात आहे. सैतानाकडे ते आहेत आणि हे काही सामान्य नाही की बाहेर जावे आणि तसे करणे आणि—आणि—आणि फाटक उघडावे आणि एका हॅलोवीन रात्रीत झाडावर टांगणे, किंवा काही छोटासा स्वार्थीपणा करणे जशी मुले करतात किंवा शेतकऱ्याची घोडागाडी घेतात आणि रस्त्यावर ठेवावी, तशासारखे नाही; परंतु ते वेडे आहेत. ते अशा गोष्टी करतात; ज्या तुमच्यावर गोळ्या झाडतात, तुम्हाला मारतील, तुमचा खून करतील, तुम्हाला वीष देतील, काहीही. ती पुढची पीढी आहे.

212 मुलांना जन्म देणे ही संपुष्टात आले आहे, स्त्रीत्व, मातृत्व. का, सर्वत्र जन्म नियंत्रण उपाय केले जातात, आणि लहान कुत्र्यांनी ती जागा घेतली आहे.

213 नैतीकता, तेथे नैतीकता राहीलेली नाही. स्त्रीया चुकीचा पोषाख करीत आहे; दूरदर्शनकडून आलेले आहे, सर्व प्रकारची नक्कल त्या वाईट हॉलीवूडच्या लोकांची, सर्व प्रकारच्या गोष्टी, फॅशन. सर्व गोष्टींचा अंत होण्याच्या समयात आहोत!

214 शिक्षणाचा शेवट होत आहे. राजकारण संपुष्टात आले आहे, युध्द अंतिम पर्वात आहे. संस्कृतीचा नाश होत आहे. ह्या सर्व गोष्टींचा शेवट होत आहे. माझ्या देवा, तर मग आपण काय करु शकतो? पुढे काय आहे? आपण सर्व गोष्टींच्या शेवटास आलो आहोत.

215 आता मंडळीचे जीवन संपुष्टात होण्याच्या स्थितीत आहे. सामान्य मंडळी, मंडळी. आता, हे थोडा वेळ टिकेल, परंतु दैहिक मंडळी, एसावाची मंडळी, ती संपुष्टात आली

आहे. ती काय करीत आहे? ती मंडळीच्या संघराज्याच्या अधिपत्याखाली जात आहे, जी शेवटी रोमनवादात सामील होईल, कॅथलिकवादाचा सामना करण्यासाठी...किंवा कॅथलिक वादाबरोबर साम्यावादाशी सामना करण्यासाठी. पोप जॉन सर्व मंडळ्यांना परत बोलावीत आहे, आणि त्या येतील. आणि ते त्यांच्यात एकत्र होतील, अगदी तसेच जसे **प्रभू परमेश्वर म्हणत आहे**.

216 तुम्ही म्हणाल, "एक मिनीट थांबा, भाऊ ब्रॅन्हम. तुम्ही विषयापासून दूर जात आहात." जर मी जात असेल, देवाने त्याचे बायबल रेषेबाहेर लिहीलेले आहे. तुम्हाला अशा स्थितीत, मिखाया असले पाहीजे.

217 त्या रात्री मॉरिस सेरुलो मला म्हणाला, "ख्रिस्तविरोधक कुठे आहे, भाऊ ब्रॅन्हम? यहुदी ख्रिस्तविरोधक आहेत."

मी म्हटले, "मॉरीस! आणि तू, एक यहूदी?"

त्याने म्हटले, "ते सर्वात अधिक परमेश्वराचा द्वेष करणारे आहेत."

218 मी म्हटले, "मॉरिस, असे बोलू नको! मला शास्त्रलेखांतून सांग की ख्रिस्तविरोधक कोठे यरुशलेममधून येतो. ख्रिस्तविरोधक रोममधून येतो, पलिस्तानामधून नाही."

तो म्हणाला, "बरे, पाहा, मी...ते परमेश्वराचा द्वेष करणारे आहेत."

219 "होय, परमेश्वराने असे म्हटले नाही का की त्याने त्यांचे डोळे आंधळे केले आहे. ह्यासाठी आम्हाला पाहता यावे? परंतु आमचा दिवस लवकरच संपेल."

220 त्याने म्हटले, "ओह, भाऊ ब्रॅन्हम, मी त्याचा कधीच विचार केला नाही." पाहा, तेथे तू आहेस.

221 पाहा, आपण अंतिम समयात आहोत. हे दैहिक जग दैहिक मंडळी ही अंतिम समयात आहे. पाहा ती कशी मंडळ्यांच्या संघराज्याच्या अधिपत्याखाली जात आहे. युनायटेड बंधुजन त्यात गेले आहेत. पेंटेकॉस्टल त्यात गेले आहेत. इतर सर्व त्यांच्यात संघटीत झाले आहेत. तुम्हाला खाली पाहात आहेत, ते कनानी एसावाच्या आत्म्याने भरलेले आहेत, खूप धार्मिक, आणि त्यांनी स्वतःला जगाबरोबर संयुक्त केले आहे; अध्यात्मिक समज नाही. ते विजय मिळवू शकले नाही, ते देवाचे निवडलेले नाहीत, बोलावलेले आणि वेगळे केलेले.

222 ओह, जर मी हे त्यात ज्ञात करु शकलो असतो, जेव्हा मी ते थोडेसे ढकलतो! ते त्याकडे पाहात नाही. त्यांच्याकडे डोळे आहेत आणि ते समजू शकत नाही, कान आहेत आणि ऐकू शकत नाही. ओह, आपण का इतके आत्म्यात मंद आहोत? आता, हे लक्षपूर्वक ऐका. सर्वकाही अंतिम पर्वात आहे.

223 आणि आत्मिक मंडळी ही तिच्या अंतिम पर्वात आहे. ती अंतिम समयाकडे येत आहे. ओह, परमेश्वरा! मागे पाहा, जेव्हा तीची सुरुवात लुथरबरोबर झाली, हालवली गेली; आत्मिक. मग वेस्लीबरोबर, पवित्रीकरणाकडे आले. नंतर पेंटेकॉस्टबरोबर पवित्र आत्मा आणि आता अंतिम समयात ख्रिस्ताचा आत्मा मंडळीमध्ये आहे, तो तीच कामे करीत आहे जी त्याने केली, अगदी सुरुवातीसारखी पुन्हा; मंडळी आणि ख्रिस्त एकत्र होण्यासाठी तयार आहेत, येशू ख्रिस्ताचे आगमन आणि मेलेल्यांचे पुनरुत्थान. आपण अंतिम समयात आहोत. येशूने तसे म्हटले, "जसे ते सदोमाच्या दिवसात होते, तसे मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्यावेळी होईल." तुम्हाला ते समजत आहे. का?

224 दैहिक मंडळीकडे पाहा. पाहा ते कोठे जात आहे. अधिक, अधिक दूर जात आहेत.

225 आत्म्याने भरलेल्या मंडळीकडे पाहा, तिच्या सर्व मुर्खपणाच्या गोष्टी हालवत आहे. आत्म्यामध्ये येत आहे, (थोडकेच आहेत, अर्थात) आत्म्यामध्ये येत आहे, परंतु अशा ठिकाणी जात आहे, जेथे पवित्र आत्मा त्यांच्यातून फिरत आहे, तिचा मार्ग तयार करीत आहे, तिच्या प्रभूला स्विकारण्यासाठी तयार आहे, तिच्या प्रभूला स्विकारण्यासाठी तयार आहे.

226 आणि जे इतर आहेत. ते संघटीत होत आहेत, जगात परत जात आहेत, विभागत आहे, संघराज्यात पुन्हा जात आहेत, एका मोठ्या संघटनेकडे कॅथलिकवादाच्या अधिपत्याखाली वळत आहेत. “आणि तेथे श्वापदासाठी एक मुर्ती बनविली आहे.” एक *मुर्ती*, “त्यासारखे काही.” मंडळीचा एक संघ कॅथलिकवादाबरोबर स्थापन केला आहे. ते दोघे एकत्र, एकत्र कार्य करतात, “ह्या श्वापदाबरोबर किंवा त्याच्या मुर्तीबरोबर कोण युध्द करील?” निश्चितच नाही. आपण ह्यातून कितीतरी तास जाऊ शकतो!

227 आता तुम्हाला मला हे सांगू द्या, आणि मग मी समाप्त करण्याची वेळ होईल. ते... मी तुम्हाला सांगितले होते हे खूप वेळ चालेल. मला—मला इतके बंद करण्यास वाटत आहे. जेव्हा देव ह्या गोष्टी सांगत आहे, म्हणतो, “त्यांना सांग. त्या सांग. तुम्ही ह्यापुढे शांत राहू नका. त्यांना ते दाखव. जर ते स्विकारीत नाही, तर ते रक्त तुझ्या हातावर नाही.” हा तो समय आहे. तो समय, पुढे जात आहे.

228 जग अंतिम समयात आहे. ते ह्यापुढे उभे राहू शकत नाही. युध्द संपुष्टात आली आहेत. तुम्ही आणखी युध्द पाहणार नाही. जर युध्द झालेच, ते तसे नसणार, पहिला तो बंदुकीचा चाप ओढील, बस. राजकारण, कुजलेले आहे आणि भ्रष्ट झाले आहे.

229 मंडळीचे जग मेथडिस्ट, बाप्टिस्ट, प्रेसबेटेरियन, पेंटेकॉस्टल्स आहे. “ते चिखलाकडे जाणारी डुकरीण, ओकीकडे जाणारे कुत्रे आहेत.” ते बरोबर आहे. त्यांच्यातील प्रत्येक जण! त्या भ्रष्टतेतून देव बोलावतो, एक मंडळी जी निवडलेली आहे. ते अगदी बरोबर आहे. एसाव, ते म्हणतात, “आम्ही ती मंडळी आहोत!” मी त्यावर संशय करीत नाही. याकोब एसावाचा सुध्दा पिता होता, ते बरोबर आहे, म्हणून, परंतु—परंतु...मला म्हणायचे आहे, इसहाक एसावाचा पिता होता. आणि याकोब त्याचा भाऊ, त्याच्या बरोबर. परंतु एक ज्येष्ठत्वाच्या हक्काला पकडून राहीला, दुसऱ्याने त्याचा द्वेष केला. एकाने ऐकले, ओळखले, आणि कृती केली. दुसरा म्हणाला, “ओह, जोपर्यंत मी मंडळीत जात आहे आणि जे बरोबर आहे ते करत आहे, त्याने काय फरक पडतो?” तुम्ही बरोबर समजलात. आता...

230 हे संपवित असताना, मी हे सांगतो, ही एक लक्षपूर्वक गोष्ट. खऱ्या मंडळीकडे जगण्यासाठी इतके आहे. होय, खऱ्या मंडळीकरिता हा आनंदाचा समय आहे, खऱ्या मंडळीसाठी, जेव्हा तुम्ही तुमच्या अंतःकरणात जाणता, की तुम्ही मरणांतून निघून जीवनात पार गेला आहात; जेव्हा तुम्ही तुमच्या स्वत:कडे पाहता आणि दिसते, तुमचे जीवन पाहा आणि पाहा की जगाच्या सर्व गोष्टी त्यातून निघून गेल्या आहेत, तुम्ही नवी उत्पत्ती झाला आहात. आता संपवताना, लक्षपूर्वक ऐका, तुम्ही समजता की तुम्ही पार झालेले आहात, तुमचे जीवन ते सिध्द करते “त्यांच्या फळावरून तुम्हीं त्यांना ओळखाल.” तुमचा पूर्ण उद्देश ख्रिस्त आहे. तुम्ही त्याची कुठल्याही वेळी वाट पाहत आहात. तुम्ही आत्म्यात चालता. तुम्ही त्याच्यावर प्रीती करिता. तुम्ही त्याला तुमच्यातून कार्य करताना पाहता. तुम्ही काहीही करण्याची इच्छा करीत नाही, परंतु तो ते करतो, स्वत:हून. होय, काय समय आहे!

231 हे मला एका कलाकाराची स्मरण देते जो रोमला गेला, एक कलाकार म्हणून शिकण्यासाठी, एक तरुण व्यक्ती. त्यांनी त्याला पाहीले. तो त्या इतर सर्व अमेरिकी मुला आणि मुलींपेक्षा इतका वेगळा होता. आणि कलाकार होण्यासाठी त्या गोष्टी तेथे पार पडल्या, आणि जगाच्या इतर भागातून. हा तरुण उत्कृष्ट होता. तो एक चांगला मनुष्य होता, आणि त्यांनी ते पाहिले. ते मोठ्या मेजवान्या करीत होते, आणि ते तेथे जात, आणि कसे ते रोममध्ये करतात, ते होईल तितके मद्य पित होते.

232 मी तेथे, स्वतः गेलो, आणि त्यांना पाहिले, रस्त्यावर बाहेर जात, पुरुष आणि स्त्रीया, असे काही करतात. अगदी सार्वजनिक उद्यानात, सार्वजनिक उद्यानात सर्वांसमोर उघड लैंगिक चाळे करतात, कोणाकडे लक्ष देत नाही, इंग्लंड, देखिल, त्यांच्यातील सर्व. समजले? ह्यासारखी वाईट स्थिती कोठेच नाही. ह्याच गोष्टी येथेही आहेत, अत्यंत वाईट: येथे थोड्या झाकलेल्या आहेत, पोलीसांमुळे वगैरे. आता, परंतु अगदी भयंकर!

233 परंतु हा, तरुण व्यक्ती, त्याने त्याला स्वतःला ह्या सर्वांपासून वेगळे ठेवले आहे. जेव्हा ते त्यांच्या मेजवान्यासाठी जात, तो त्यांना जाऊ देत असे, परंतु तो एक कलाकार होण्यासाठी शिकत होता. म्हणून, एके दिवशी एक वयस्कर काळजीवाहू, जो एक ख्रिस्ती होता तो तेथे त्या पुराणवस्तु संग्रहालयाच्या अवतीभवती असे, त्या कलादालनाच्या, त्याने म्हटले—त्याने म्हटले, "मुला, आपण थोडं फिरुया, आपण थोडे फिरुया, मला तुझ्याशी थोडं बोलायला आवडेल."

त्याने म्हटले, "ठिक आहे."

234 म्हणून ते गेले, एका टेकडीवर चालत गेले, आणि दोघांचे हात त्यांच्या मागे होते, टेकडीवर गेले. सूर्य मावळत होता. आणि म्हणून त्या वयस्कर मनुष्याने त्या तरुण कलाकाराला म्हटले, त्याने म्हटले, "मुला, तू एक अमेरिकी आहेस."

त्याने म्हटले, "मी आहे."

235 त्याने म्हटले, "तु येथे तुझे कलेतील शिक्षण घेण्यासाठी आला आहे, मला वाटते. तुझ्या जीवनात कलाकाराचे काम करण्याचे तुझे ध्येय आहे."

त्याने म्हटले, "श्रीमान, मी ते करण्याचे योजले आहे."

म्हणाला, "मला वाटते तू एक ख्रिस्ती आहेस."

त्याने म्हटले, "मी एक ख्रिस्ती आहे."

236 त्याने म्हटले, "बरे, तेथे आणखी एक गोष्ट आहे, मला तुला विचारायला आवडेल. मी ह्या दुसऱ्यांना विचारले आहे. ते म्हणतात ते देखील ख्रिस्ती आहेत." त्याने म्हटले, "असे काय आहे जे तुला वेगळे करते? तुझ्यात काय आहे जे तुला ह्या इतर अमेरिकी मुलांपेक्षा वेगळे ठरवते; आणि ह्या अमेरिकी मुलींपेक्षा? तुझ्यामध्ये हे वेगळे काय आहे, आणि तरीही तुम्ही सर्व सांगतात तुम्ही 'ख्रिस्ती' आहात?"

त्याने म्हटले, "श्रीमान, तुम्ही त्या सूर्याला मावळताना पाहत आहात?"

त्याने म्हटले, "मी पाहत आहे."

237 त्याने म्हटले, "ह्या समुद्रापलिकडे, न्यू इंग्लंडच्या एका राज्यात त्या राज्याच्या एका शहरात, आणि त्या शहराच्या एका घरात, एक मुलगी आहे, जिला मी अभिवचन दिले आहे की मी तिच्याशी प्रामाणिक राहीन." त्याने म्हटले, "तेच सर्व माझ्या मनात आहे, माझे कलेचे शिक्षण घ्यावे आणि पुन्हा त्या मुलीकडे जावे जी माझ्याशी प्रामाणिक राहत आहे." त्याने म्हटले, "तशाच प्रकारे मी जगत आहे हे करून."

238 ओह, भावा, बहिणींनो, तुम्हाला आश्चर्य वाटेल, का आपण जे ते सांगतात त्याची पर्वा करीत नाही. ते काय सांगतात ह्याची मी पर्वा करीत नाही.

239 मी त्या दिवशी फ्रेडबरोबर उभा होतो, सन ज्युआन येथे, प्युरटो रिको, समुद्रापलिकडे पाहात होतो, आणि पाहिले की, कॉरल रीफ, तेथून अर्धा मैल बाहेर, त्यांच्यावर मोठ्या लाटा उसळत होत्या. त्याने म्हटले...फ्लेमिंगो बागेत चालत आहेत, तसेच. मी म्हणालो...त्याने म्हटले, “भाऊ ब्रॅन्हम, हे स्वर्गासारखे आहे.”

240 मी म्हणालो, “भावा, परंतु समुद्र तेथे शांत असेल.” मी म्हणालो, “ह्या समुद्रापलिकडे तेथे एक ठिकाण आहे ज्यास स्वर्ग म्हणतात, तेथे एक आहे ज्यास येशू म्हणतात, ह्या स्वर्गात एके दिवशी त्याने माझी सर्व पापे घेतली. आणि मी त्याला अभिवचन दिले मी त्याच्याशी प्रामाणिक राहीन, मी त्याच गोष्टी करीन ज्या मी कराव्या अशी त्याची इच्छा आहे.” हेच कारण आहे की मला त्याच्या सुवार्तेची लाज वाटत नाही, ते तारणासाठी देवाचे सामर्थ्य आहे, ज्यामुळे ख्रिस्ती वेगळे जीवन जगतात. तो वेगळा आहे कारण त्याच्याकडे काहीतरी आहे तसे वेगळे जगण्याकरिता.

आपण आपली मस्तके काही क्षणासाठी झुकवूया.

241 माझ्या उदास मित्रा, ह्या सकाळी, तुमच्याकडे काही वेगळे जगण्याकरिता आहे काय, काही गोष्ट जी तुम्हाला जगाबाहेर आणील, काहीतरी असे जे तुमच्याकरिता जगापेक्षा अधिक आहे, की ख्रिस्ताकरिता जगावे? जर ते तुमच्याकडे नाही, तर तुम्ही त्याचा आता का स्विकार करीत नाही. केवळ मंडळीत जाऊ नका आणि म्हणू नका की “मला एक चांगला व्यक्ती बनायचे आहे. तसे करू नका. तुम्हाला एक ख्रिस्ती बनायचे आहे.” तुम्ही, जर तुमच्या अंतःकरणात असे योग्य काहीतरी आहे, जे तुम्हाला सांगते, “तुम्ही योग्य नाही, परंतु माझी इच्छा आहे तुम्ही योग्य बनावे.” तुम्हाला नेहमीच काही बनण्याची इच्छा असेल जे आता तुम्ही नाही, तुम्हाला हे ठाऊक नाही की देव तुम्हाला बोलावीत आहे? त्यावर तुम्ही पाठ फिरवू नका. “कारण जर एकदा तुम्हाला प्रकाश मिळाला होता आणि संधी मिळाली होती, आणि शेवटच्या वेळी ती गमावली, तुमच्या पापाकरिता आणखी यज्ञ होणार नाही.” एसावाबरोबर होऊ नका.

242 याकोबाबरोबर या, पर्वा न करता...तुम्हाला त्यासाठी कितीही किंमत मोजावी लागेल ह्याची पर्वा करु नका. जर त्यासाठी तुम्हाला तुमचे घर सोडावे लागेल, जर त्यासाठी तुम्हाला तुमची नोकरी सोडावी लागेल, तुमची पत्नी सोडावी लागेल, जर तुम्हाला तुमची लेकरे सोडावी लागेल, जर त्यासाठी तुम्हाला कितीही किंमत मोजावी लागेल; ज्येष्ठत्वाचा हक्क मिळवून घ्या. ते महत्त्वाचे आहे. आणि जर तुम्ही तशाप्रकारे आज अनुभव करीत असाल, ह्या सकाळी, आणि तुम्हाला ज्येष्ठत्वाचा हक्क हवा असेल! मी तुम्हाला तो देऊ शकत नाही. परमेश्वर देऊ शकतो, आणि तोच एक जो तुमच्याशी बोलत आहे. काय तुम्ही तुमचा हात वर कराल म्हणाल, “भाऊ ब्रॅन्हम, माझ्यासाठी प्रार्थना करा. ते ज्येष्ठत्व, मला हवे.” परमेश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो, सगळीकडे पलिकडे. “तो ज्येष्ठत्वाचा हक्क, मला पाहीजे.”

243 आमच्या स्वर्गीय पित्या, मी तुझे आभार मानतो, अति थोर आणि पवित्र देवा, तुझ्या सर्व चांगुलपण आणि दयेबद्दल जी तू मनुष्यांच्या पुत्रांवर आणि कन्येवर केली. आणि आम्ही जाणतो की आपण अंतिम समयात आहोत, कुठलीही गोष्ट अधिक काळ टिकू शकत नाही. आम्ही ह्या कर्जाऊ समयात राहत आहोत, जसे नोहाच्या दिवसात होते, देव सहन करीत वाट पाहत होता, जेव्हा तारू तयार होत होते, जेव्हा केवळ आठ जीव

वाचविण्यात आले. तुम्ही म्हणता, “तसे मनुष्याचा पुत्र प्रगट होईल त्या दिवसात होईल. देवाची सहनशीलता, कोणाचाही नाश होऊ नये, परंतु सर्वांनी सर्वत्र पश्चाताप करावा.”

244 आणि आज ह्या इमारतीत, तेथे पुरुष आणि स्त्रीया आहेत त्यांनी हात वर केले आहेत, मुले आणि मुली, तरुण आणि वृध्द, त्यांचे हात उभारले आहेत, आणि म्हणत आहेत, “तेथे काहीतरी आहे जे माझ्याकडे खेचत आहे.” हे देवा! ते कधीच मागे न फिरोत. ते त्यांचे शिक्षण विकोत, ते त्यांच्याकडचे सगळे विकोत. त्या मनुष्यासारखे ज्याला ते मौल्यवान मोती सापडले, ते लक्षवेधी होते, मौल्यवान मोती, तो सर्वात मौल्यवान मोती होता, आणि त्याने त्याचे जे होते नव्हते ते विकले, ह्यासाठी की त्याने हा मौल्यवान, ह्यासाठी की त्याने हा मौल्यवान, महान मोती विकत घ्यावा. ह्या सकाळी, ते त्यांनी त्यांचे सर्व विकावे जे त्यांच्याकडे जगाचे आहे, त्यांची जगातील सर्व प्रसिध्दी.

245 ह्या स्त्रीया येथे बसलेल्या आहेत, प्रभू, त्यांच्यातील किती जणांनी कित्येक वेळा ही सुवार्ता ऐकलेली आहे, आणि अजूनही जगात रुतले आहे, आणि जगासारखी फॅशन आणि जगासारखा पोषाख करीत आहेत, आणि मेजवान्यास जात आहेत आणि जगातील गोष्टी करीत आहेत, जगातल्या गोष्टीत सहभागी होत आहेत. आणि जगासारखे वागत आहेत, आणि जगातील गोष्टी वापरत आहेत. हे देवा, त्यांना ह्या सकाळी, लाज वाटो. जर त्यांच्यात आज काही आशा असेल, प्रभू, त्यांना आज बदल. आज तो क्षण असू दे.

246 आणि हे पुरुष, प्रभू, हे देवा, त्यांच्यावर दया कर. त्यांच्यातील कितीजण अजूनही जगातल्या गोष्टीत चालत आहेत, अजूनही जगातील गोष्टींची आवड धरीत आहे आणि आनंद करीत आहे, पाप, धुम्रपान, मद्यप्राशन, संगतीप्रीय मद्य, थोडी बिअर, किंवा—किंवा तशासारखे काही किंवा वासना येते, आणि चित्रे टांगतात, अश्लील पोषाख घातलेल्या तरुण स्त्रीया आणि त्यांची शरीरे रस्त्यावर बघतात, आणि ते जवळ—जवळ धावतात की लोकांनी त्यांच्याकडे पाहावे, स्वतःला ख्रिस्ती म्हणतात.

आणि तुम्ही समजा की स्त्रीच्या शरीराचा तो भाग, कदाचित चोवीस तासात, कबरेत कूजला जातो, ढेकूण आणि किडे त्या शरीरावर सर्व भागावर चालतात, आणि तिचा जीव पलिकडे सैतानाच्या नरकात, कारण ती तशाप्रकारे जगली. आणि तरीही ती ते तोकडे कपडे, रंगविलेले ओठ, ह्यास चिकटून आहे, आणि तुमच्यावर हसत आहे.

247 देवा, ह्या लोकांवर दया कर. हे प्रभू, त्यांचा नाश होऊ देऊ नकोस. कृपया दया कर आणि दया पाठव. त्यांतील प्रत्येकाला दे, प्रभू. तूच एक आहेस जो हे आशीर्वाद देऊ शकतो आणि जर तू त्यांना सार्वकालिक जीवनासाठी बोलावलेले आहे, त्यांची अंतःकरणे उघडली जावोत, आणि त्यांनी सर्व गोष्टी ह्या सकाळी बाजूला ठेवाव्या, आणि मगच ते त्यांना प्राप्त होईल. पित्या हे प्रदान कर.

248 आणि आता पवित्र आत्मा ह्या सभेत येवो, आजारी आणि पीडित लोकांकरिता, आणि लोकांना हे कळू दे हा संदेश जो ह्या सकाळी प्रचार केला गेला आहे, की येणारया आणि सर्व गोष्टी शेवटास आल्या आहेत आणि येशू देखिल त्याच्या मंडळीत कार्य करीत आहे. हे आताच घडू दे, प्रभू की तू ह्या लोकांना तुझ्या हाती घेऊ शकशील. आणि जेव्हा ते पवित्र आत्म्याला कार्य करताना, लोकांमधून फिरताना पाहतील जो मी संदेश प्रचार केलेला आहे, तो खात्री देऊन जावो, की आपण अंतिम समयात आहोत. आणि ते तो ऐकोत. त्यांनी ऐकला आहे, आणि ते ओळखोत की तोच येशू, जसे त्याने त्याच्या दिवसात केले, तो ते येथे त्याच्या मंडळीत ह्या अंतिम दिवसात करत आहे. आणि मग ते कृती करोत, त्यांचे जीवन आणि शरीर, आत्मा आणि जीव त्याला देण्याद्वारे मी त्यांना तुला देतो, प्रभू, येशूच्या नावाने.

249 आता, ह्या इमारतीत जेथे लोकं आहेत, मी ह्या सकाळी बीलीला प्रार्थना पत्रे देण्यासाठी पाठवितो. तो...[टेपवर रिकाम्या जागा.—सम्पा.]

250 तुम्ही आजारी आहात, गरजू? जर परमेश्वर मला प्रगट करील, जसे त्याने त्या विहीरीजवळ स्त्रीला केले आणि तुमची काय समस्या आहे ते मला सांगेल, किंवा तुमच्याविषयी काही, जे तुम्हाला ठाऊक आहे की मला ठाऊक नाही; ह्यामुळे तुम्ही देवावर विश्वास ठेवाल का? ह्यामुळे इतर तुम्ही विश्वास कराल का? ही आपली पहिली सभा आहे का? [बहिण म्हणते, "नाही."—सम्पा.] ओह, तुम्ही मला ह्या अगोदर पाहिले आहे, परंतु मी तुम्हास अनोळखी आहे. हे बरोबर आहे? ठीक आहे, प्रभू परमेश्वर तुझी विनंती मान्य करो.

251 आता, हे खरे आहे की नाही? माझ्या देवा! तुमच्या बौध्दिक धर्माला बोलवा, "बालिम," म्हणाला, "तो कोठे आहे?" एलिया कर्मेल डोंगरावर म्हणाला, "बालीम कोठे आहे? त्याला जागे करा." तुम्हाला येशूला जागे करावे लागणार नाही, तो सदैव जागा असतो. तो सदैव उपस्थित आहे, जीवंत आहे, नेहमी समर्थ; काल, आज, आणि युगानुयुगसारखा आहे. आमेन. देव देवच राहतो.

252 तुम्ही विश्वास करता तुमचा हृदयरोग तुमच्यातून निघून जाणार आहे आणि तुम्ही बरे होणार आहात? तुम्ही येथले नाही. तुम्ही लेक्झीटनला परत जा आणि लोकांना सांगा किती महान गोष्टी प्रभूने तुमच्यासाठी केल्या आहेत. समजले?

253 हे कित्येक लोकांच्या डोक्यावरुन जाते ते त्यांना कधीच समजत नाही. एक जीवंत मंडळी ते लगेच, आत्मसात करते, आणि समजते की पवित्र आत्म्याची उपस्थिती येथे आहे.

254 मागे कोणीतरी त्यांचे हात उभारले आहेत. काय बाई, तुम्ही आहात? तू विश्वास ठेवतेस की परमेश्वर तुझी समस्या मला सांगू शकतो? ती...

255 एक भाऊ शेवटी तेथे, मला वाटते त्याने म्हटले, काही वेळा अगोदर, की तू विश्वास करतोस, भावा? [भाऊ म्हणतो, "होय."—सम्पा.] तू करतोस का? तर मग तुझा त्वचेचा विकार तुला सोडून गेला आहे, तू बरा होशील? तू त्यावर विश्वास ठेवतोस का? तुला आरोग्य मिळाले आहे हे तू स्विकार करतोस काय? तुझे हात वर कर, तू कर. समजले? ठीक आहे. तो माझ्यासाठी अनोळखी आहे. तुला ठाऊक आहे, पॅट.

256 एक स्त्री तेथे पाहत आहे, प्रार्थना करीत आहे, माझ्याकडे बघत आहे, म्हणाली ती एक अनोळखी आहे. तू विश्वास ठेवतेस उच्च दाब तुला सोडून जाणार आहे? ते बरोबर आहे, हो की नाही? जर हे खरे आहे तर तुमचा हात वर करा. ठीक आहे, देवावर विश्वास ठेवा.

तुम्हाला समजत आहे मला काय म्हणायचे आहे?

257 तुमच्यातील काही जण जे मला ओळखतात त्यांच्याविषयी काय? तुमच्या हृदयात काहीतरी आहे. तुमचे हात वर करा. तुमच्यातील कित्येक जण! मी ते ओळखू शकत नाही; ते बाहेर आले पाहीजे. तुम्हाला ठाऊक आहे, हा तुमचा विश्वास आहे.

258 जॉर्ज ब्रूस मी तिला तेथे बसलेली पाहात आहे. तू नेहमी कोणासाठी काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करतेस, जॉर्जी, तू कॅंसरमधून बरी झाली होती. तुझ्या मनात काहीच प्रश्न नाही. तो दिवस जेव्हा तू ह्या आराधनालयात आली आणि त्या दरवाज्यातून आत आली, पवित्र आत्मा माझ्यावर आला, आणि तुला तेथेच काहीतरी सांगितले जे ह्या जगात कोणालाच ठाऊक नाही परंतु तुला आणि देवाला आणि दुसरा व्यक्तीला. हे खरे आहे

का? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] ते बरोबर आहे. तू माझ्यावर विश्वास ठेवते, तू ठेवत नाहीस का जॉर्जी? जॉर्जी, तुझ्या हृदयात काहीतरी आहे. तू विश्वास करतेस देव मला तुझ्या हृदयात काय आहे ते सांगू शकतो?

ह्यामुळे इतर तुम्ही लोक माझ्यावर विश्वास करु शकता का? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.]

259 मला ठाऊक आहे जॉर्जी, परंतु ती कशाविषयी तरी विचार करीत आहे. ती दोन जणांसाठी प्रार्थना करीत आहे, जे येथून दूर आहे. ते दोघेही कॉरिडॉन येथे राहतात. ते बरोबर आहे. आणि येथे एक व्यक्ती आहे, ज्या व्यक्तीसाठी ती प्रार्थना करीत आहे, तो हॉस्पीटलमध्ये आहे, आणि तू प्रार्थना करीत आहेस, त्याच्या आरोग्यासाठी इतकी करत नाहीस, परंतु त्याच्या जीवाच्या तारणासाठी करीत आहे. ते **प्रभू परमेश्वर असे म्हणत आहे.** ते खरे आहे. ते खरे आहे, जॉर्जी? ते अगदी बरोबर आहे.

260 कोणीतरी मागे तेथे त्यांचे हात वर केले आहेत. मागे तेथे मागे, येथे. तूम्ही, तुमच्याविषयी काय? काय तुम्ही तुमचे हात वर कराल, तुम्ही माझ्यासाठी अनोळखी आहात? येथे बसलेला हा मनुष्य माझ्याकडे बघत आहे मी तुम्हाला ओळखत नाही. मी देवाचा संदेष्टा, देवाचा सेवक आहे, ह्यावर तुम्ही विश्वास करता काय? तुम्ही पवित्र आत्म्यावर विश्वास करता का, जे मी सांगितले आहे ते खरे आहे? तुम्ही त्यावर विश्वास करता? [भावाने म्हटले, “होय”—सम्पा.] जर तुम्ही विश्वास कराल, तुम्ही...तीच एक गोष्ट आहे जी तुमच्याकडे आहे, कारण तुम्ही कॅन्सरने पीडीत आहा. ते खरे आहे. तुम्ही त्या शहरातील नाही.

261 तुम्ही न्यू अल्बनी येथले आहात. ते खरे आहे आणि तुम्हाला कॅन्सर आहे. जर तुम्ही तुमच्या पूर्ण हृदयाने विश्वास कराल, तुम्ही बरे व्हाल. तुम्ही त्याचा स्विकार कराल का? तुमचे हात वर करा. प्रभूचे नाव धन्यवादीत असो. मी विश्वास करतो, ती स्त्री तेथे पांढऱ्या रंगाची टोपी डोक्यावर घातलेली, कृष्णवर्ण स्त्री, तिचा हात वर केला आहे. येथे माझ्याकडे एकही कृष्णवर्ण व्यक्ती नाही. तू विश्वास करतेस, बाई? खरे आहे, श्रीमान, तुमच्या पूर्ण अंतःकरणाने विश्वास करा. तुम्हाला हृदयाचा त्रास, पोटाचा त्रास आहे, इतर समस्या. कोणीतरी तुम्हाला येथे ह्या सकाळी आणले आहे, **प्रभू परमेश्वर असे म्हणतो.** ते बरोबर आहे, नाही का, बाई? जर ते खरे आहे, तो रुमाल जो तुमच्या हातात आहे हलवा, ह्यासाठी की लोकांनी पाहावे. मी ह्या स्त्रीला माझ्या आयुष्यात कधीच पाहीले नाही.

262 तुम्ही तुमचे हात वर केले आहेत? काय मी तुमच्यासाठी अनोळखी आहे? आणि तुम्ही माझ्यासाठी अनोळखी आहात. तुम्ही विश्वास करता देव मला ओळखतो, किंवा देव तुम्हाला ओळखतो? तुम्ही विश्वास करता तो मला तुमच्या हृदयातील गोष्टी सांगू शकतो? तुम्ही कोणासाठी तरी प्रार्थना करीत आहे. ते तुमचे वडील आहेत. त्यांना हृदयाची समस्या आहे. ते खरे आहे. आणि तुम्हाला पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा हवा आहे. **प्रभू परमेश्वर असे म्हणतो.**

जर तुम्ही विश्वास करु शकाल!

263 त्या स्त्रीबद्दल काय जिने *असे* हात वर केले आहेत. तू विश्वास करतेस काय? तुझी समस्या ही आहे की तुझ्या हातावर पुरळ आहे परंतु तू तुझ्या नातवासाठी प्रार्थना करीत आहेस. ते बरोबर आहे. ते मुल सामान्य नाही. हे खरे आहे. बाई असे नाही का? तु तुझ्या संपूर्ण हृदयाने त्यासाठी विश्वास कर.

जेव्हा मी म्हटले, "मूलगा." एक मिनीट थांब. ओह, तेथे तू आहेस. तुझ्या मुलाच्या गाडीला अपघात झाला, पंगु झाला आहे. बाई, मी तुला ओळखत नाही, परंतु ते खरे आहे, जर ते खरे आहे, तुझे हात वर कर.

264 आता, येथे कोण आहे? ते कोण आहे? तो मी नाही. मी ते कसे करु शकतो? आत्म्याविषयी संवेदनाशून्य होऊ नका, आत्मिक गोष्टींविषयी येथे परमेश्वर आहे! तो पवित्र आत्मा तुम्हाला हवाय, तुम्ही त्यावर आता विश्वास करता का? ठीक आहे, बर, आता त्याचा स्विकार करा. हीच वेळ तो स्विकारण्याची आहे. तुम्ही संपूर्ण हृदयाने विश्वास करा.

265 तुम्ही जे आजारी किंवा गरजू आहात. मी बरे करु शकत नाही. कोणताही मनुष्य बरे करु शकत नाही. मी पवित्र आत्मा देऊ शकत नाही, परंतु एक जो बरे करु शकतो आणि पवित्र आत्मा देऊ शकतो, तो येथे आहे, तोच एक जो ते करतो.

266 आता तुमची मस्तके झुकवा. तुम्ही आताच विश्वास करा, जेव्हा मी तुमच्यासाठी आणि ह्या रुमालांसाठी प्रार्थना करतो.

267 आमच्या स्वर्गीय पित्या, जोपर्यंत मी जाणतो, मी प्रत्येकांकडे गेलो जे अनोळखी होते, मी स्वतःमध्ये खूप अशक्तपणा अनुभवत आहे आणि थांबवावे; पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने वाटते हाच समय आहे जो निवडलेल्यांनी पाहिला आहे. प्रत्येक जण आणि त्यांच्यातील हरएक जण, प्रभू, जो बोलावला आहे आणि तुझ्या आत्म्याद्वारे बोलावण्याची परवानगी दिली आहे; काही गोष्ट, त्यांचा विश्वास, त्यांच्याकडे अधिक विश्वास होता. (त्यांच्यातील काहीजण) त्यांना वाटले त्यांच्याकडे होता. त्यांच्या हृदयात आता सुरुवात झाली आहे.

268 आणि त्या स्त्रीने त्याच्या वस्त्राला एकदा स्पर्श केला जेव्हा तो बाजूने गेला, आणि तो वळला आणि म्हणाला, "मला कोणी स्पर्श केला?"

आणि त्यांनी म्हटले, "अरे, सर्वच जणांनी तुला स्पर्श केला आहे."

269 त्याने म्हटले, "परंतु माझ्यातून शक्ती गेल्याचा अनुभव मला होत आहे." आणि त्याला ती लहान स्त्री आढळली आणि तिला म्हणाला, तिला रक्तस्त्रावाचा आजार होता, आणि तिच्या विश्वासाने तिला बरे केले.

270 आणि बायबल म्हणते, की, "तो आजही मुख्य याजक आहे, ज्याला आपल्या अशक्तपणाबद्दल सहानुभूती आहे." वचन म्हणते, "तो काल, आज, आणि युगानुयुग सारखा आहे." आणि जर तो सारखाच आहे, तोच प्रमुख याजक, तो तशीच कृती करील आणि त्याच गोष्टी करील.

271 आणि लोकं बघतील की आत्म्याने भरलेली मंडळी पुढे येत आहे. ख्रिस्त येईल आणि त्याची मंडळी घेऊन जाईल. त्यांची अंतिम अद्भूत चिन्हे, जसे ते सदोमाच्या दिवसात होते; जो बोलला, सारेला ओळखत होता, आणि ठाऊक होते की त्याला एक पत्नी आहे जिचे नाव सारा आहे, त्याला ठाऊक होते की ती तेथे डेऱ्यात हसली; त्याने म्हटले, "ते चिन्ह असेल. जेव्हा तुम्ही ते पहाल, लक्षात ठेवा, हे सर्व घडेपर्यंत ही पिढी नाहीशी होणार नाही." येथे ती आहे. आपण अंतिम समयात आहोत.

272 प्रदान कर, प्रभू, की येथील प्रत्येक आजारी मनुष्य जाणो की जिवंत येशू ख्रिस्त येथे उपस्थित आहे. हे रुमाल प्रत्येक आजारी शरीरासाठी जेथे ते जातील आशीर्वादीत होवो. मी त्या सैतानाचा, ह्या लोकांकरिता निषेध करतो. मी देवाच्या आत्म्याद्वारे, विश्वासामध्ये त्याला बाहेर काढतो. मी संशयाच्या प्रत्येक छायेला हाकलून देतो. येथील प्रत्येक मनुष्य जो सार्वकालिक जीवनासाठी नियुक्त केलेला आहे. ते त्याला प्राप्त होवो. प्रत्येक अंधश्रध्दा, प्रत्येक लहान तृप्ती, जगातील प्रत्येक लहान गोष्ट, प्रत्येक छोटासा

भार, जसे बायबल म्हणते, “सर्व भार, आणि सहज गुंतविणारे पाप टाकून आपल्याला नेमून दिलेल्या धावेवरुन धीराने धावावे. पाहत” (कशाकडे? मंडळीकडे? संघटनेकडे?) “आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू ह्याच्याकडे पाहत असावे.” जो येथे आहे. “येशू ख्रिस्त देवाचा पुत्र.” त्याच्याकडे पाहावे जो...आपल्याला शब्द घ्यायचे नाही जे आपल्याला ठाऊक आहे की ते खरे आहेत, परंतु तरीही ते शब्द आपल्यासाठी ह्या सकाळी खरे केले आहेत. तोच येशू जो मेला, तो मृत नाही, तो पुन्हा उठला आहे आणि दोन हजार वर्षांनंतर तो त्याची मंडळी मस्तकाकडे आणित आहे, यहुदाचा आत्मा त्यांच्यामध्ये कार्य करीत आहे. परंतु ते प्रत्येक अडखळणारे दगड आणि सर्व गोष्टी, ह्या समयी दूर करोत आणि त्याला स्विकारो.

273 ते आज ह्या प्रचाराद्वारे, जे त्यांच्याकडे आहे ते ऐको. ते आता ते वचन ओळखो जे त्यांनी एकले आहे जे त्यांना प्रगट करण्यात आले आहे, आणि त्यांनी ते ओळखले आहे, तो ख्रिस्त आहे आणि ते आता कृती करोत, त्यावर कृती करो; त्याचा स्विकार करो, आणि त्यांच्या पायावर उभे राहो, साक्ष देवो; आणि देवाच्या राज्यात जाओ, पवित्र आत्म्याने भरले जावोत.

274 आजारी बरे केले जावोत. पीडीत बरे केले जावोत. प्रत्येक हृदयाची इच्छा नीट केली जाओ. सर्वसमर्थ परमेश्वरा, ते प्रदान कर.

275 आता तुमची मस्तके झुकलेली असता, तुमची हृदय उघडलेली असता, तुम्ही स्वत:ला प्रार्थनेचा समय द्या, जरा अगोदर, मला वाटते, बाप्तिस्म्याची सभा येत आहे, ह्या अगोदर. आज रात्री तेथे दुसरी सभा असेल!

276 आता, लक्षात ठेवा, ही संधी जाऊ देऊ नका. मी येथे अडीज तासापासून किंवा, त्यापेक्षा अधिक माझा वेळ घेण्याचा प्रयत्न करीत आहे, आणि सुवार्ता आणित आहे आणि परिपूर्णरित्या ती ठेवत आहे. आता आपण शेवटास आलो आहे. आणि विषय: ऐकणे, ओळखणे, कृती करणे तुमच्या डोक्यावरुन जाऊ देऊ नका. तुम्ही ते ऐकले आहे. काय तुम्हाला समजते की त्याची उपस्थिती येथे आहे? तुम्हाला ठाऊक आहे की हा तो आहे जो तुम्हाला बोलावीत आहे? तर मग त्यावर कृती करा. देव तुमच्यासह असो. प्रार्थनेचा समय काढा.

277 भाऊ नेव्हील, तुम्ही या, प्रार्थनेमध्ये, जर तुम्ही याल.

त्याच्याबरोबर राहा.

***परमेश्वराचे वचन ऐकणे, ओळखणे, त्यावर कृती करणे*** MAR60-0221

(Hearing, Recognizing, Acting On The Word Of God)

हा संदेश मूळ रूपाने इंग्रजीत भाऊ विलियम मेरियन ब्रॅन्हम यांनी रविवार सकाळी, 21 फेब्रुवारी, 1960 रोजी, अमेरिकेच्या इंडियानाच्या जेफरसनविले येथील ब्रॅन्हम टेबरनेकल, जेफरसनविले, इंडियाना, यु.एस.ए मधून प्रचार केला होता. जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. व्हॉईस ऑफ गॉड रेकॉर्डिंगद्वारे हे मराठी अनुवाद छापले व वितरित केले

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.



VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org